परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ११० ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०१७

Website : www.marathepratishthan.org

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सस्नेह नमस्कार.***

वसंतऋतूचे आगमन झाले आणि वठलेल्या, सुकलेल्या झाडांनाही तांबूस, पोपटी पालवी फुटलीय. मोगरा दरवळतोय. आंब्याच्या झाडावर हिरवट पोपटी नाजूक कैऱ्या झुलतायत. पोपटी शब्द परत परत येतोय, पण मनही तसंच झालंय! थंडीतला ठोस पौष्टिक आहार आता मागे पडून आंबट चिंबट, करवंदे, जांभळे यासारख्या रानमेवा, आंबेडाळ, कैऱ्यांचे केसर-वेलची घातलेले थंड पन्हे, आईस्क्रीम, फालुदा, शीतपेये, भेलपुरी, पाणीपुरी खायचे दिवस आले आहेत. उन्हाच्या काहिलीने त्रस्त वातावरण आंब्याच्या आगमनामुळे रंगतदार आणि रसदार होऊन जातं. त्यातही तो आंबा कोकणातला अस्सल देवगड हापूस असेल तर बात काही औरच!

मंडळी संपादकीयची सुरुवात अशी काव्यमय झाली त्याला तसेच कारणही आहे. 'हितगुज' मार्च २०१७ च्या अंकात प्रतिष्ठानने 'वर्षागीते : काव्य स्पर्धा' घोषित केली होती आणि सांगायला आनंद वाटतो की आपल्या कुलबांधव-कुलभगिनींनी अगदी त्या प्राथमिक शालेय वयातल्या मुलामुलींनाही या स्पर्धेत भाग घेऊन अक्षरशः कवितांचा पाऊस पाडला. स्पर्धेचा निर्णयही याच अंकात दिला आहे. विजेत्या स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन त्यांच्या कविता या अंकात आपल्याला वाचायला मिळतीलच. खरं तर सर्वच कविता उत्तम आहेत, प्रकाशन करण्यायोग्य आहेत. तेव्हा 'हितगुज' मध्ये त्यांना प्रसिद्धी दिली जाईल. पुण्याचे ज्येष्ठ सभासद श्री. माधव मराठे यांनाही कल्पना सुचली आणि प्रतिष्ठानने ती उचलून धरली. असो.

आपले कुलबांधव बुद्धिमान, विद्वान लेखक परमार्थाचे थोर अधिकारी असे श्री. प्र.सि. मराठे यांनी उपनिषदांचा सेट (संच) आणि ४ X ४ MAGICS QUARES. या पुस्तकाच्या पाच प्रती प्रतिष्ठानला भेट म्हणून पाठविल्या आहेत. या पुस्तकात Original Discovery विश्लेषण करून दाखविली आहे. Birth Date Magic Squares बनवण्याच्या पद्धतीही यात विशद करून दाखविल्या आहेत. मुंबई युनिर्व्हसिटी व I.T.I. मुंबई मधील प्राचार्यांनीही या पुस्तकाला 'Original Contribution' म्हणून प्रशस्ती दिली आहे. या पुस्तकाची किंमत १०० रु. आहे. पण आपल्या मराठे परिवाराला ८० रु. ला सवलतीत मिळेल. श्री. प्र.सि. मराठे यांचे प्रतिष्ठानद्वारा आभार आणि व्यक्तिगत माझा आदरपूर्वक नमस्कार आणि धन्यवाद. पुस्तकांची 'साभार पोच' ही देत आहे. कुलबंधूंनी ही पुस्तके वाचून या योजनेचा लाभ घ्यावा ही विनंती. या अंकातील, 'बोगदे बांधणीचे तंत्रज्ञान आणि रस्त्याचे बोगदे' या शीर्षकाचा श्री. रमाकांत विद्वांस यांचा लेख वाचनीय आणि उद्बोधक आहे. बालकांची वर्षागीते ही पावसात चिंब भिजविणारी आहेत. श्री. नंदकुमार मराठे यांचा संगीत चिवड्यावरचा उत्कृष्ट लेख वाचून कै. श्री. गोविंद मराठ्यांच्या चार पिढ्या हे दुकान चालवीत आहेत हे कळून कौतुक वाटते व कोल्हापूरी जाऊन चिवड्याचा आस्वाद घेण्याची तीव्र इच्छा होते. घुसमट कथा मन अस्वस्थ करते. एकूणच काय मनोरंजन, आरोग्य, पर्यटन, ललित, कथा, काव्य अशा विविधतेमुळे 'हितगुज' दिवसेंदिवस वाचनीय होत आहे. असो.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. २४ मे २०१७)

### वर्षागीते : काव्य स्पर्धेचा निकाल

- **प्रथम क्र.** : सौ. विजया का. मराठे, खोर्ली-म्हापसा (गोवा)
- **उत्तेजनार्थ क्र.** १) कुमार मयंक मराठे (वय ९), सांगली, २) कुमारी अनघा निरंजन मराठे (वय ६), तळेगाव

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# वर्षागीते काव्य स्पर्धा

## प्रथम क्रमांक

### मृगाचा पाऊस

झावळ्यांच्या त्या 'खोपीत'
चुलीत पाणी गळायचं
नशिबाला मग दोष देत
आईने सतत रडायचं
चुलीतून निघायचे
धूराचे लोट
गळ्यात दसर
रिकामे पोट
पाऊस जाण्याची वाट बघत
बापू सोप्यावर बसायचे
विडी फुंकायला खिशात त्यांच्या
खोटा रुपया पन नसायचा
कुंडली मालती घागर दवली
कशाच टोपलं भिडाची तवली
आमच्या झोपडीतली ही श्रीमंती
आईच्या डोळ्यात नेहमी पाणी
कधी चुलीच्या धूराच
कधी तिच्या संसाराच्या!
बेसुरलेल्या सुरांच!
फुंकून फुंकून खोकल्याची
उबळ तिला यायची
न चुकता आई मग
शिव्या पावसाला द्यायची!
पुन्हा पुन्हा म्हणायची
कर रे वैर्या त्वाण्ड काळं
कोपर्यात कशी झोपलीत बघ
गरिबाची उपाशी बाळं!
पण मृगाचा पाऊस तो
आणखी जोरात पडायचा
दरवर्षी झोपडीत आमच्या
हाच उपक्रम घडायचा!

– **सौ. विजया का. मराठे,** (पृ. ५२६)
खोर्ली–म्हापसा (गोवा)

## उत्तेजनार्थ

### येरे येरे पावसा...

अंगणात सुंदर मातीचा वास सुटला
जोरदार पाऊस पडू लागला
आज्जी अंगणात घेऊन मला गेली, धावत, धावत
येरे येरे पावसा, तुला देते पैसा...
पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा
आजीशी फेर धरून, मजा लुटत गाणे म्हटले
ओलीचिंब झाले, पावसात आंघोळ झाली
गार गार वाटले, पावसाला सोडून घरात
जाऊ नयेसे वाटले, इतका पाऊस मला खूप खूप आवडला
उकाड्याने कोण हैराण केले होते, एसी शिवाय बसवत नव्हते
आईने केली कांदा भजी मस्त, बाबांनी केली फस्त
दुसऱ्या दिवशी आनंदाने शाळेत गेले. मनात पाऊस घेऊन
RAIN RAIN GO AWAY
COME ANOTHER DAY!
टीचरचा असा रागच आला पण, करणार काय?
मनात मात्र पावसाचे गाणेच गात होते
अंगणात ओली चिंब पावसात नाचत होते
येरे येरे पावसा, तुला देते पैसा...
माझ्या 'कोरड्या' टीचरला 'ओली' कर रे बाप्पा

– **चि.कु. अनघा निरंजन मराठे** (वय ७)(पृ. १२०)
तळेगाव, पुणे

### पावसाळा

पावसातले दिवस वेगळे,
लहानमुलांच्या आवडीचे ते
वारा, पाऊस यांचा खेळ तो
ढगामधूनी वीज कोसळे
सगळीकडे तळे साचती
लहानमुले त्यात खेळती
अंगणामध्ये मोर नाचतो
ढगामधूनी पाऊस पडतो
वारा, पाऊस यांचा खेळ तो
वारा, पाऊस यांचा खेळ तो

– **मयंक मराठे** (वय ९)
सांगली

**दहावी व बारावी परीक्षांचे निकाल आले आहेत. पदवी परीक्षांचेही यथावकाश येतील. या परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन. या विद्यार्थ्यांसाठी प्रतिष्ठानने भरघोस पारितोषिके ठेवली आहेत. त्याविषयी अधिक माहिती पृष्ठ क्र.१५ वर आहे. सर्व पारितोषिक पात्र विद्यार्थ्यांनी दि. १० जुलै पर्यंत गुण पत्रिकेची प्रत इमेलने/प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पत्र पाठवून संपर्क साधावा.**

● **कार्यवाह :** हेमंत :
hemant.a.marathe@gmail.com
● **कोषाध्यक्ष :** श्रीनिवास :
Shriniwas_marathe@yahoo.com

कथा:

# घुसमट

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, (पृ. १२०) दूरध्वनी -०२२- २४१५०८८९

**प्रत्येकाच्या आयुष्यात विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. वेगवेगळ्या कारणाने मनाचा कोंडमारा होत असतो आणि अशा प्रत्येक घटनेला एक निश्चित शेवट असतो. कधी चांगला, कधी वाईट. कधी पुनर्मिलन, तर कधी कायमची ताटातूट!**
**...मात्र, नीताच्या बाबतीत नेमका शेवट कसा होणार? या विचाराने झालेल्या तिच्या घुसमटीची कथा.**

नीताने प्रकाशच्या घरात स्वप्नपूर्तीच्या विश्वासाने आनंदात प्रवेश केला. प्रकाशची पत्नी या नात्याने आता ती आपल्या मनातील सुखी संसाराचे स्वप्न साकारणार होती. या सुखी संसाराचा आधार असलेला तिचा पति-प्रकाश तिला जसा हवा होता तसाच लाभला. सुशिक्षित, चांगला कमावता, घरंदाज, रुबाबदार, एकत्र कुटुंबात राहाणारा आणि विशेष म्हणजे आई-वडिलांना आदराने मानणारा होता. प्रकाशला एकच बहीण - तीही नीताच्या वयाची आणि एकच भाऊ म्हणजे आटोपशीर कुटुंब. बहीण लवकरच लग्न होऊन स्वतःच्या संसारात मग्न होणार आणि प्रकाशचा भाऊही शिक्षण आटोपून नोकरी व्यवसायात गुंतल्यावर विवाह करून वेगळे बिऱ्हाड थाटणार!

उत्तम स्वयंपाक करून टापटीपीने रसिकतेने गोड संसार करायचा. सुसंस्कृत आनंदी 'गृहिणी' म्हणून मिजाशीत वावरायचे हीच तिची मनिषा होती. प्रेमाने भरभरून सुखी संसार करायचा हे तिचे स्वप्न होते. ते आता प्रत्यक्षात घडणार या आनंदाने ती मोहरली होती.

...नीता साधी, सुंदर, पदवीधर तरीही अहंकाराचा किंवा बेफाट अपेक्षांचा स्पर्श नसलेली युवती. तिची एकच प्राथमिक अपेक्षा होती. वर संशोधनासाठी घरच्या मंडळींना अजिबात त्रास पडू नये. पहिल्याच 'पाहाण्यात' ती पसंत पडून लग्न ठरावे, अशी तिची अपेक्षा ती सफल झाली. हा तिचा पहिला विजय.

खरं म्हणजे, नीता 'पहिल्या पाहाण्यात' पसंत पडण्यासारखी होतीच.

ती रंगाने गोरी (..नि हजार गुण चोरी) होती. तिच्या गोऱ्या रंगावर कोणतीही साडी खुलून दिसायची. चेहरा विशेष 'मेकअप' शिवाय मोहक होता. डोळे जरी घारे होते तरी तिची शीतल प्रेमळ दृष्टी सुखावणारी होती. बांधा मध्यम तरी प्रमाणबद्ध आणि आकर्षक होता. तिची आजी नेहमी म्हणायची, "लग्नाच्या बाजारात एक 'रंग' नि दुसरे 'अंग' लागते!" या दोन्ही गोष्टी नीता जवळ होत्या. परंतु, गुणवत्तेला भाग्याची जोड असली तरच यश मिळते. नीता त्या दृष्टीने भाग्यवती ठरली.

मुंबईत चांगल्या 'स्थळा' इतकेच त्याच्या राहात्या जागेला महत्त्व आहे. प्रकाशची सध्याची जागा म्हणजे टिपिकल 'वन रून किचन' होती. परंतु घरातच संडास-बाथरूम स्वतंत्र होते. इतकी स्वयंपूर्ण जागा मिळणे हे ही कमी महत्त्वाचे नव्हते. शिवाय, प्रकाशने उपनगरात एका मोठ्या ब्लॉकसाठी 'बुकिंग' ही केले होते! नणंदेच्या विवाहानंतर ती तिच्या उबदार घरट्यात जाणार होती. आणि, दीराला ही 'स्वयंपूर्ण' झाल्यानंतर पंख फुटणार होतेच म्हणून, मध्यंतरीच्या काळात, नीताला त्या लहानश्या घरकुलांत नांदणे कठीण वाटले नाही. नीताला माहीत होतं की, माणसांची मनं मोठी असली श्रीमंत असली तर लहान जागेतही 'स्वर्गसुख' मिळतं!

ती स्वभावतःच सुसंस्कृत, समजुतदार, परिस्थितीशी जुळवून घेणारी होती.

नवीन स्वप्न, आशा-आकांक्षा घेऊन नीताने तिच्या हक्काच्या घरात पाऊल टाकले. बाहेरची खोली थोडीशी मोठी आणि त्यामानाने आतले स्वयंपाकघर लहान, त्यात फ्रीज, दुधदुभत्याचे कपाट, उभ्याचा ओटा, ओट्याच्या कडेला पाण्याने भरलेली भांडी. शाळेतील दंगा करणारी मुले घंटा झाल्यावर प्रार्थनेच्या वेळी जशी चिडीचूप होऊन बसतात तशा स्वयंपाक घरातील या सर्व वस्तू दाटीवाटीने निमूटपणे, पण शिस्तीत बसल्या होत्या. दिवसाचे स्वयंपाकघर तेच रात्री नीताचे शय्यागृह होत होतं. त्या दोघा प्रेमिकांच्या मीलनाचे, प्रेमळ शृंगारांचे हे स्वयंपाकघर साक्षीदार होते.

नवी नवेली असताना नीताला फार संकोच आणि लज्जा वाटे पण प्रकाशच्या आश्वासक प्रेमळ स्पर्शाने त्याच्या गरम मिठीत ती स्वतःला झोकून देई, आणि हरवून जाई. मिटलेल्या कळीचे उमलते फुल कधी झाले हे तिला समजलेच नाही. प्रकाशच्या प्रेमाने त्याच्या उन्मादक स्पर्शाने ती तृप्त होत होती. प्रकाशलाही नीता सारखी 'हवीहवीशी' वाटायची. एकत्र कुटुंबात, छोट्या घरात जर कुठे एकांत मिळाला की तो एकांत प्रकाशने 'सार्थकी' केलाच म्हणून समजा! अशा वेळी नीता फार कावरीबावरी व्हायची. कोणी पाहील म्हणून घाबरायची. लटकेच प्रकाशवर रागवायची. पण खरे तर ती निसटती चुंबने, ती ओझरती, धावती आलिंगने तिला उत्तेजित करायची.

...लग्नानंतर प्रथमच नीता माहेरी गेली. नव्या नव्हाळीचे तेज तिच्या चेहेऱ्यावर लकाकत होते. आईने पाहाता क्षणीच, 'लग्न चांगले मानवले हो! आमचे जावईबापू चांगले दिसताहेत', असा आपला अभिप्रायही देऊन टाकला.

पहिल्या माहेरपणाची गोडी काही वेगळीच. माहेरच्या सर्व कुटुंबियांना नीताच्या सासरच्या मंडळींविषयी खूप कुतूहल होतं. सासू-सासरे कसे वागत असतील, नणंद-दीर खेळीमेळीने नीताशी वागत असतील ना?... असे एक ना अनेक प्रश्न माहेरच्या नातलगांना विचारायचे होते. परंतु नीताचा मुळ स्वभावच मुळी तक्रार करण्याचा नव्हता. तिने कोणत्याच प्रश्नाला खरे आणि सरळ उत्तर दिले नाही. आणि त्यांना वस्तुस्थितीचा थांगपत्ता लागू दिला नाही. परंतु तिची आई अपवाद ठरली. कारण तिला आपल्या मुलीचा स्वभाव चांगला माहीत होता. स्वतःचं दुःख इतरांना चेहेऱ्यावर सुद्धा दिसू नये, असा तिचा प्रयत्न असायचा.

पण आईचं हृदय. तिनं मनोमन काही जाणलं होतं. एरव्ही आई म्हणायची, ''माझी नीता शुद्ध आणि शांत मनाची. तिचं मन म्हणजे जसं साजूक तूप. जशी दुधावरची साय. ती कधी कोणाला दुखवायची नाही.''

आईने जेव्हा नीताला छेडलं तेव्हा मात्र तिने मन मोकळं केलं आणि आईच्या लक्षात आले की, नीताच्या सासरची मंडळी मनाने चांगली नाहीत संकुचित, कोत्या वृत्तीचे सासरचे कुटुंब आहे. सासू-सासऱ्यांना तिचे मुळीच कौतुक नाही. नीताच्या चांगल्या गोष्टीही सासूला आवडत नाहीत. नणंद तर चक्क दुःस्वास करते. दीर उडाणटप्पू आहे. त्या कुटुंबाच्या तुसड्या स्वभावामुळे शेजारच्यांशीही चांगले संबंध नव्हते.

या पार्श्वभूमीवर प्रकाशचा सज्जन स्वभाव नीताला मोठा आधार होता. प्रकाशने मोठा मुलगा या नात्याने कुटुंबासंबंधीची आपली कर्तव्ये पूर्ण करण्याचे धोरण ठरविले होते. सायंकाळी ऑफिसातून परतल्यावर तो घरात आनंदी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करी. मग बाकीचे त्याच्याशी कसेही वागले तरी त्याचा तो विषाद वाटून घेत नसे.

नीता सासरला परतली. आता ती अधिक पक्क्या निर्धाराने आपली संसारातील भूमिका शक्य तितक्या आनंदी वृत्तीने पार पाडत होती. पण दैवाने मात्र तिच्या सोशिकपणाचा अंत पाहाण्याचे ठरविले. तिच्या सासऱ्यांना अचानक अर्धांगवायूचा झटका आला. ते कायमचे अपंग परावलंबी झाले. नीताने मात्र सासूबाईंच्या बरोबरीने त्यांची सेवा-सुश्रूषा केली. सासूने त्याची दखलही घेतली नाही. उलट अधिक चिडचिडी झाली. नणंदेच्या लग्नाची खटपट असून लग्न जमत नव्हते. नीताचा दीरही नापास होत राहिल्याने मार्गी लागला नव्हता. नोकरीसाठी वणवण करीत होता. या गोष्टींमुळे सासूच्या त्राग्यात अधिकच भर पडली.

अशा कोंदट वातावरणात नीताला प्रकाशच्या सहवासात मात्र सर्वार्थांने सुख मिळत असे. प्रकाशच्या बाहुपाशात ती घरातील सर्व कटकटी विसरत होती. प्रकाशने प्रेमाने जवळ घेऊन तिच्या केसावरून हात फिरवत 'दमलीस ना?' असे नुसते विचारले की काय जादू घडायची, मोरपीस फिरल्यासारखा, सगळा तिचा थकवा, मनाची मरगळ कुठंच्या कुठे निघून जायची.

नीता आणि प्रकाश यांच्या प्रणयी जीवनाला छकुलीच्या जन्माने प्रेमाचा गोड 'नजराणा' मिळाला. प्रकाश नीताला म्हणालाही ''आपल्या छकुलीचा पायगुण चांगला, ब्लॉक तयार झाला आहे'' .... नीताही नव्या जागेची स्वप्ने पाहात होती. ज्या जागेत तिला मोकळा श्वास घेता आला असता. आता प्रकाश आणि छकुली हे तिचे प्राणवायू होते. छकुलीच्या बाललीला म्हणजे नीताच्या जीवनातील मोठा विरंगुळा होता.

तयार झालेल्या ब्लॉकमध्ये राहायला गेल्यावर आपल्याला मनासारखे जीवन जगता येईल या आशेवर ती दिवस घालवीत होती.

...पण तिच्या या आशेलाही अखेर सुरूंग लागला! प्रकाशने ती जागा भाड्याने देऊन टाकली! प्रकाशने या निर्णयाचे कारणही नीताला सांगितलं नाही!

... पण खरं कारण 'आवश्यकता' हेच होतं. अर्धांगवायूच्या आजाराने अपंग झालेल्या वडिलांवर आधुनिक तंत्राने महागडे उपचार केल्यास त्यांचे अपंगत्व बरेचसे कमी होणार होते. म्हणून पैसा उभा करण्यासाठी त्याने ब्लॉक भाड्याने दिला.

म्हणजे, आता नव्या ब्लॉकमध्ये मनमोकळेपणाने जीवन जगण्याची आशाही खुंटली! ज्या एका प्रबळ आशेवर, दिवसभर होणारा मनाचा कोंडमारा आतापर्यंत सहन करीत आली होती. ती आशाही आता नष्ट झाली.

...तरीही नीताने आपल्या मूळ प्रवृत्तीनुसार तीही निराशा पचवून टाकण्याचे ठरविले. निर्विकारपणाने तिने आपल्या सोशिकतेची मर्यादा वाढविली. रात्रीचे तर 'स्वर्गसुख' कोणी तिच्यापासून हिरावून घेणार नव्हते ना?

...पण नीताचा हा विश्वास ही उद्ध्वस्त होण्याच्या मार्गास लागला. जणू दैव तिच्या सहनशीलतेचा अंत करण्याची प्रतिज्ञा घेऊन उभे ठाकले होते.

अलिकडे तिला प्रकाशच्या वागण्यात पूर्वीची आतुरता दिसेनाशी झाली. वरकरणी तो पूर्वीप्रमाणेच हसून खेळून गोड बोलायचा. जेवण झाल्यावरही नीता ज्यावेळी त्याला सुगंधी बारीक सुपारी देई त्यावेळी तो तिच्याकडे मिस्किलपणे हसत बघायचाही.

...पण एके रात्री त्याने आपली निजण्याची व्यवस्था बदलली! आपले आंथरूण त्याने गॅलरीत टाकले.

नीताने प्रश्नार्थक मुद्रा केली असता, त्याने फक्त मौनानेच उत्तर दिले.

वास्तविक त्याच रात्री नीताने त्याला त्याचे स्पष्ट कारण विचारावयास हवे होते, पण नीताचा भिडस्तपणा आड आला. आणि हीच भीड तिची पुढे वैरिण ठरली!

प्रथम तिला वाटले की, खूप थकव्यामुळे त्याला एखाद्या रात्री अगदी एकट्यानेच निवांत झोपावयाचे असेल. त्याच्या गाढ झोपेच्या आड पत्नीचा आवडता स्पर्शही येऊ नये, असे त्याला वाटत असावे.

...आश्चर्य असे की, दुसऱ्या रात्रीही तशीच पुनरावृत्ती झाली. आठवड्याभरात तर त्याने तसा नियमच केला असावा असे लक्षात आले.

...नीताला वाटले कीं, अधूनमधून तरी, तीन-चार दिवसांनी का होईना प्रकाश त्या छोट्याश्या खोलीत रात्री तिची शय्यासोबत करेल. परंतु तसे घडले नाही. एक आठवडा संपला. दुसरा... तिसरा... चौथा आठवडाही संपला. म्हणजे प्रकाशने नीताची शय्यासोबत सोडून अनेक महिने उलटले. पूर्वी, निदान रात्री तरी तिला सुखाचा 'प्रकाश' दिसायचा. आता तर प्रकाशने तिची रात्रही दुःखाची अमावस्या केली!

तेव्हा नीताला राहावले नाही. प्रकाश तिची शय्यासोबत का टाळत आहे, याचे तिला कोडे पडले! मनातल्या मनात वेगवेगळ्या शंकाकुशंका काढत बसण्यापेक्षा प्रकाशला तिने यासंबंधी स्पष्टच विचारायचे ठरविले. जेव्हा त्यांना दुर्मिळ असा एकांत मिळाला, तेव्हा तिने त्याला विचारले, ''तुम्हाला अलिकडे माझ्या शय्यासोबतीची गरज वाटत नाही का? का, तुम्हाला मी इतक्यातच आवडेनाशी झाले? पूर्वी आपण याच छोट्याश्या जागेत निजत असू आणि त्यातच संधी मिळेल तसे शय्यासोबतीचे सुख उत्कटपणे लुटत असू! मग, अलीकडे तुम्ही असे विरक्त का झालात? मला मात्र प्रत्येक रात्र तळमळत काढावी लागते. वाटते, मध्यरात्री कोणत्याही क्षणी तुम्ही आत याल, आणि मला आवेगाने बाहुपाशात घ्याल! परंतु पदरी पडते ती फक्त निराशा. असे तुम्ही वागणे का सुरू केले, हे मला आता सांगितलेच पाहिजे.''

...काही क्षण शांततेत गेले. नंतर त्याने तुटकपणे का होईना, उत्तर दिले, म्हणाला, 'वेडी आहेस तू! शांत, निर्विकारपणे माझ्यासारखी झोपत जा. सवय होईल हळूहळू!''

....आणि त्याने तो विषय संपविला! नीताला मात्र या उत्तराने समाधान वाटण्याऐवजी अधिकच अस्वस्थ वाटू लागले.

...तिला प्रकाशचा प्रथमच संताप आला! तिला वाटलं हे सर्व इतक सोपं असतं? प्रकाशला सांगायला काय जातंय? पण तिला प्रत्यक्ष आचरणात आणणं कठीण जात आहे! का हा असा वागतो? कातडं अंगावर पांघरून घेतल्यासारखा! यातून मार्ग निघण्यासारखा आहे का? यानेच सर्व वाटा बंद करून टाकल्या आहेत! तिच्या मनाची घालमेल, तिची होणारी तडफड त्याला समजत नसेल? तिच्या हळव्या मनाची स्पंदने त्याला जाणवत नसतील? तिची आर्तता, उत्कटता त्याला व्याकुळ करीत नाही? अशा प्रश्नावलीने. नीताला अधिकच संभ्रमात टाकले.

ती मूक आक्रंदन करीत राहिली. तिचं वेड मन म्हणे, ''केवळ शरीर संबंधासाठीच तू मला नकोस तर तुझ्या प्रेमाचा, मायेचा स्पर्श, सर्व दुःख बुडून जाण्याची क्षमता असलेली तुझ्या भक्कम बाहुपाशातील मिठी हा तिचा आधार होता.'

'दमलीस का?' हा तिची हनुवटी वर उचलून केलेला प्रश्न, तिच्या जगण्याला सतत बळ देत आला होता.

... आणि प्रेमानं ओथंबलेला शरीरसंबंध तरी का नको? कारण, आत्मिक प्रेम अखेरीस उत्कट शरीर संबंधातूनच साकारते ना? आत्ताशी नीता कुठे फक्त चोवीस वर्षांची होती. तिच्या बरोबरीच्या मैत्रिणींची अद्याप लग्नंही झाली नव्हती.

...असाच काही काळ लोटला. नीताला प्रत्येक रात्र तळमळत, अस्वस्थ अवस्थेत काढायची सवय होऊ लागली. पण मनाचे समाधान मात्र अजिबात झाले नव्हते. उलट तिच्या मनात अलिकडे प्रकाशविषयी नाना कुशंका येऊ लागल्या!

माणूस एक दिवस घरी जेवणार नाही. उपास करू शकेल, घरचा स्वयंपाक आवडत नाही, दर्शविण्यासाठी असाच उपाशी राहू शकेल. पण आठवडेच्या आठवडे तो घरी जेवल्याशिवाय, उपाशी कसा राहू शकेल?

आणि अशा परिस्थितीत, तो महिनाभर उपाशी राहून, दिवसभराची कार्यक्षमता अन्नपाण्याशिवाय कशी ठेवू शकेल? ...छे! हे अजिबात शक्य नाही. तो घरचे अन्न घेत नाही, इतकाच निष्कर्ष त्यातून निघेल! घराबाहेर मात्र त्याने आपल्या उदरभरणाची सोय आपल्या आवडीनुसार निश्चितपणे केलेली असणार!!

हा विचार तिच्या मनात स्थिर झाला. प्रकाशने 'बाहेरच' आपली शारीरिक भूक भागविण्याची व्यवस्था केली नाही ना?

आता तिची बेचैनी पराकोटीला पोहोचली. परंतु तिला निश्चित काही लक्षात येईना. कारण, सायंकाळी प्रकाश ऑफिसातून घरी कधीही उशीरा परतायचा नाही. वेळेवर घरी परतल्यावर तो स्थितप्रज्ञतेने आपले कार्यक्रम आटोपायचा. घरातल्या मंडळीशी आवश्यक तेवढेच बोलणे, जेवणे आणि भोजनोत्तर थोडेसे वाचन करून नियमितपणे गॅलरीतील आपल्या अंथरुणावर निवांत झोपणे! त्रयस्थाला त्याच्या वागणुकीत कोणताच बदल जाणवायचा नाही.

...असेच दिवस जात होते. पण एका दुपारी अनपेक्षित आणि धक्कादायक घटना घडली. एका अनोळखी माणसाने तिच्या दीराचे आयडेंटिटी कार्डवरील पत्त्यानुसार घरी येऊन तिला सांगितले, 'या माणसाला अपघात झाला आहे. त्याला डॉ. जोशींच्या नर्सिंग होममध्ये ॲडमिट केले आहे. तो बेशुद्ध आहे, त्याचे बरेच रक्त गेले आहे. ऑपरेशनही करावे लागणार याची शक्यता आहे. त्यासाठी ताबडतोब कुटुंबियांची अनुमती आवश्यक आहे, असा निरोप डॉक्टरांनी आपणास देण्यास सांगितले आहे.'

...या अपघाताच्या बातमीने घरात आकांत झाला. अपंग सासऱ्यांची बोबडीच वळली, कधी नव्हे त्या सासूबाईही मुलाच्या कळवळ्याने ओक्साबोक्शी रडू लागल्या. तेव्हा नीतानेच स्वतःला सावरून त्यांना धीर दिला. म्हणाली, ''तुम्ही काळजी करू नका. मी आताच्या आता ह्या गृहस्थांना घेऊन

प्रकाशच्या ऑफीसमध्ये टॅक्सीने जाते आणि तेथूनच परस्पर ह्यांना घेऊन, नर्सिंग होममध्ये जाऊन परत येते.'' ...आणि घरातल्या साडीवरच तीरासारखी ती त्या माणसाबरोबरच घराबाहेर पडली. टॅक्सीने प्रकाशच्या ऑफीसात पोहचली.

...यापूर्वी तिला प्रकाशच्या ऑफीसमध्ये जायची वेळ आली नव्हती. त्यामुळे तिने ऑफीसच्या वॉचमनला प्रकाशची केबिन कुठे आहे ते विचारले आणि ती सरळ केबिनमध्ये गेली.

तिच्या अनपेक्षित आगमनाने प्रकाश आणि त्याची स्टेनो आश्चर्यचकित होऊन दचकल्याचे तिला स्पष्टपणे जाणवले.

पण प्रकाशनेच स्वतःला सावरून हसत-हसत नीताची ओळख आपल्या स्टेनोशी करून दिली. 'ही माझी पत्नी नीता आणि ही माझी स्टेनो मिसेस रीटा!'

रीटाने तत्काल मोहक हसून नीताशी 'शेकहॅन्ड' केला. नीताने क्षणभर दिराला झालेला अपघात विसरून रीटाचे व्यक्तिमत्त्व टिपून घेतले.

रिटा वर्णाने काळी होती पण अंगाने तिच्यापेक्षा धष्टपुष्ट आणि उंच होती. तिचे लिपस्टिक लावलेले लालभडक ओठ आणि मागे दडलेली मोत्यासारखी दंतपक्ती, ती हसताना समोरच्या व्यक्तीला आकर्षक वाटावी. तिचे डोळे काळेशार आणि मोठे होते. गुबगुबीत गालांमुळे नाक सरळ असले तरी ऊपरे वाटे. तिच्या रोमारोमात मादकता भिनलेली दिसली. स्वतः देखणी स्त्री असूनसुद्धा, तिला रीटाच्या मादक सौंदर्याचे वेगळे आकर्षण जाणवले. हस्तांदोलनात तिच्या लुशलुशीत तळव्यांतील उबदारपणा तिला जाणवला. तिच्या सर्वांग स्पर्शाची दाहकता किती असेल यांची तिने कल्पना केली.

...क्षणार्धात नीताला वास्तवाचे भान आले. आणि तिने एका दमात दीराला झालेल्या अपघाताची बातमी सांगितली. म्हणाली, ''आपणास लगेच निघायचे आहे. बाहेर नर्सिंग होममधील मनुष्य उभा आहे.''

प्रकाशही वज्राघात झाल्याप्रमाणे गंभीर झाला. नीताबरोबर घाईघाईने केबिनबाहेर पडताना रीटाला म्हणाला, ''सॉरी!... आजचा बेत.. पुन्हा केव्हातरी...''

...टॅक्सीने तिघे नर्सिंग होममध्ये पोहोचले. डॉक्टरांनी इमर्जन्सी ऑपरेशनची सोय केलेली होती. नीताच्या दीराच्या डोक्याला जखम झालेली दिसली. शरीर रक्तबंबाळ झालेले दिसले. डॉक्टरांनी थोडक्यात प्रकाशला ऑपरेशनची माहिती सांगितली. त्याची एका कागदावर संमतीची सही घेतली आणि त्यांनी ऑपरेशनला सुरुवात केली. नीता आणि प्रकाश बाहेरच्या खोलीत थांबले होते. तासाभराने डॉक्टरांनी ऑपरेशन यशस्वी झाल्याचे सांगून, त्यांना घरी जाण्यास हरकत नाही, असे सांगितले.

घरी परतल्यावर दोघांनीही सासूसासऱ्यांना सविस्तर माहिती सांगून, वेळीच उपचार झाल्याने आता काळजी करण्याचे कारण नाही, असे म्हटले.

त्यानंतर प्रकाश घरीच थांबला. नेहमीच्या स्थितप्रज्ञतेने नित्याप्रमाणे वागू लागला. रात्री भोजनोत्तर वाचन आटोपल्यावर निवांतपणे गॅलरीतल्या आपल्या अंथरूणावर झोपला. आणि लवकरच तो गाढ झोपी गेला जणू काही भावाच्या अपघाताची चिंता त्याला नव्हतीच!

... मात्र नीता अतिशय चिंताग्रस्त होऊन आपल्या अंथरूणावर तळमळत होती. (छकुलीला नेहमीप्रमाणे कुशीत न घेता तिच्याकडे पाठ करून ती आडवी झाली होती इतकेच!)

त्या रात्री तिचा डोळा क्षणभरही लागला नाही. मनात नको-नको त्या विचारांचे कल्लोळ उठले होते.

...दिराच्या अपघात ग्रस्त प्रकृतीमुळे नव्हे, तर प्रकाशच्या 'शय्यासोबती'तील नीरसपणाचे कारण, त्याची स्टेनो रीटा तर नसेल, या कल्पनेमुळे!!

तसा विचार केला तर प्रकाश आणि त्याची स्टेनो यांचे वागणे ऑफीसातील शिष्टाचाराला शोभणारेच होते. त्यात काही वावगे वाटावे अशी भावना अन्य स्टाफमध्ये झालेली तिला जाणवली नाही.

...म्हणजे तिला प्रकाशसंबंधी अनुचित संशय घेणे, एकीकडे बरोबर वाटत नव्हते तर दुसरीकडे तिच्या आणि रीटाच्या व्यक्तिमत्त्वातील फरक तिला जाणवल्यामुळे ती अधिकाधिक अस्वस्थ होऊ लागली. या परिस्थितीत निर्माण झालेल्या संशयाचे भूत तिच्या मनात घर करून बसले इतके मात्र खरे.

दुसरे दिवशी, तिने प्रकाशला याविषयी स्पष्टपणे विचारायचे ठरविले. पण प्रत्यक्षात तो जेव्हा ऑफीसातून परतला त्यावेळी त्याची स्थितप्रज्ञता पाहून तिला काही विचारायची हिंमत झाली नाही.

कारण त्याच्या चेहेऱ्यावर अपराधीपणाचा लवलेशही दिसत नव्हता. किंबहुना रीटाच्या संबंधी नीताच्या मनात काही संशय निर्माण होण्याची शक्यता वाटली असावी, असेही त्याला जाणवले नाही. जणू काही, अशी शक्यता बोलून दाखविणे म्हणजे प्रकाशच्या निष्पाप, निरपराधी मनावर ओरखडा काढल्यासारखे तर होणार नाही ना? तो दुखावला तर जाणार नाही ना?

... नीताची वृत्ती मुळातच निर्मळ-भिडस्त, सोशीक, आपल्यावर अकारण हजार आघात झाले. तरी दुसऱ्यावर सकारणसुद्धा, अशा संशयाने एकही आघात करण्याची तिची नीती नव्हती!

...तिचा भिडस्तपणाच अखेरीस तिचा शत्रू ठरला ती धड प्रकाशावर सात्त्विक संतापाने रागावू शकतही नव्हती आणि सर्वार्थाने दुरावलेला प्रकाशचा सहवास तिला सहनही करता येत नव्हता!

...त्यातूनच निर्माण झाली तिचे हृदय विदीर्ण करणारी मनाची प्रदीर्घ घुसमट!

❖

# बोगदे बांधणीचे तंत्रज्ञान आणि रस्त्यांचे बोगदे

• श्री. रमाकांत माधव विद्वांस, (पृ.६२३), माटुंगा दूरध्वनी – ०२२ २४३०५२६०

नुकताच काश्मीरमधील राष्ट्रीय महामार्ग ४४ वरील चेनानी आणि नाशरी या गावांना जोडणारा पटनीटॉप या उंच डोंगराखालून जाणारा बोगदा, माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला अर्पण केला. हा बोगदा सध्यातरी आशिया खंडातील सर्वात लांब रस्त्यावरील बोगदा आहे. या बोगद्याच्या आखणीपासून ते पूर्णाकृतीपर्यंत सर्व टप्प्यात माझा तांत्रिक सल्लागार म्हणून सहभाग होता ही माझ्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे.

या बोगद्याला दूरदर्शन आणि वृत्तपत्रांनी खूप प्रसिद्धी दिली. साहजिकच रस्त्याचे बोगदे आणि ते कसे निर्माण केले जातात याबद्दल जनतेत कुतूहल निर्माण झाले आहे. म्हणून हा लेख.

बोगदा म्हणजे दोन जागांना जोडणारी पोकळी. अशा पोकळ्यांचा उपयोग रेल्वे व रस्त्यांसाठी, जलविद्युत आणि सिंचन प्रकल्पात पाणी वाहून नेण्यासाठी, खनिज तेल आणि रासायनिक द्रव्य साठविण्यासाठी, वाहने, लढाऊ विमाने आणि युद्धनौकांचे तळ आणि शस्त्रसाठ्याची कोठारे यासाठी केला जातो. हा लेख मी रस्त्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या बोगद्यांबद्दल आणि त्याच्या निर्मितीबद्दल मर्यादित ठेवला आहे.

बोगद्याची निर्मिती ही एक खर्चिक बाब असते. जलविद्युत आणि सिंचन प्रकल्पात पाणी वाहून नेण्यासाठी पर्याय म्हणून कालव्याचा वापर करता येतो. रेल्वे आणि रस्त्यांना पण वळणमार्ग हा पर्याय असतो. लढाऊ विमाने आणि युद्धनौकांचे तळ आणि शस्त्रसाठ्याची कोठारे यांना सैनिकी महत्त्वामुळे पर्याय नसतात. त्यामुळे इतर पर्यायांच्या तुलनेत आर्थिक दृष्ट्या किफायतशीर किंवा इतर कारणामुळे गरजेचे असल्यासच बोगद्याचा पर्याय विचारात घेतला जातो.

जमिनीवर बांधकाम करून किंवा जमिनीत खड्डा करून आणि त्यात बांधकाम करून निर्माण केलेले बोगदे असे काही अपवाद वगळता बहुतेक सर्व बोगदे हे जमिनीच्या पोटात उत्खनन करून निर्माण केले जातात. भूगर्भात निरनिराळ्या तऱ्हेचे आणि ताकदीचे प्रस्तर तसेच वाळू आणि माती यांचे स्तर असतात. या प्रस्तरात उभे आणि आडवे जोड असतात. बऱ्याचवेळा भूगर्भातील पाण्यामुळे त्यात दमटपणा असतो. या सर्वांचा परिणाम प्रस्तरांच्या बोगदे बांधण्यासाठी लागणाऱ्या क्षमतेवर होतो. अशा स्तरांतून बोगदे निर्माण करण्यासाठी निरनिराळी तंत्रे वापरावी लागतात.

एकदा अशा दोन जागांना जोडणारा बोगदा निर्माण करण्याचे ठरले की त्या जागांना सरळ जोडणाऱ्या आणि आजूबाजूच्या भागांच्या नकाशांचा अभ्यास केला जातो. त्यानंतर त्या भागांचे सर्वेक्षण केले जाते. या सर्वेक्षणात नकाशात न दाखवलेली बांधकामे नकाशावर समाविष्ट केली जातात. पृष्ठभागावरील कमीतकमी बांधकामांना बोगद्याच्या बांधकामामुळे शक्य तेवढी कमी झळ पोहोचेल या दृष्टीकोनातून बोगद्याचा मार्ग (अ‍ॅलाईनमेंट) आखला जातो.

बोगदा भूगर्भातील निरनिराळ्या तऱ्हेच्या स्तरातून जात असतो. भूगर्भातील प्रस्तरभंग (फॉल्टस), वळ्या (फोल्डस) इत्यादी दोष, जे या स्तरांना कमकुवत बनवतात, त्याबद्दलची माहिती भूपृष्ठावर दिसण्यात येणाऱ्या भूरचनेच्या (सरफेस जिऑलॉजी) अभ्यासात प्राप्त होते. बोगद्याचा मार्ग आखताना ज्या मार्गात असे दोष कमीतकमी असतील असा मार्ग निवडला जातो.

निवडलेल्या मार्गावरच्या भूगर्भातील स्तरांचा बोगदे बांधण्यासाठी लागणाऱ्या क्षमतेचे मूल्यांकन करणे जरूरीचे असते. बोगदे निर्माण करण्यासाठी वापरावी लागणारी तंत्रे या मूल्यांकनावर अवलंबून असतात. यासाठी भुपृष्ठावरून भूगर्भात भोके पाडून प्रस्तारांचे नमुने गोळा केले जातात. या नमुन्यावर प्रयोगशाळेत चाचणी करून प्रस्तराच्या बोगदे बांधण्यासाठी लागणाऱ्या क्षमतेचे मूल्यांकन केले जाते.

अशा तऱ्हेने बोगद्याचा मार्ग निश्चित केल्यावर बोगदा बांधण्याच्या दृष्टीने कृती सुरू होते. प्रथम ज्या दोन बिंदूंना बोगदा जोडणारा असतो ते बिंदू जमिनीवर चिन्हांकित केले जातात. एक दोन दशकापूर्वी त्रिकोणमितीच्या तंत्राचा वापर करून त्रिकोणांचे आभासी जाळे निर्माण करून हे बिंदू जोडले जात असत आणि बोगदा खणण्याचा मार्ग निश्चित केला जात असे. त्यानंतर इलेक्ट्रॉनिक्सवर आधारीत ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम – जीपीएसचा वापर करून बोगदा खणण्याचा मार्ग निश्चित केला जात आहे. जीपीएसमधील अचूकतेमुळे दोन टोकांकडून खणलेले कैक किलोमीटर लांब बोगदे फक्त दोन तीन सेंटीमीटर फरकाने मिळतात.

साधारणपणे बोगदा बनण्यासाठी बोगद्याच्या कमानीवर ६ मी. ते ८ मी. सक्षम प्रस्ताराची जरूरी असते. प्रथम बोगद्याच्या दोन्ही टोकांवर खड्ड्यासारखे खोदकाम करून बोगद्याची जिथून सुरुवात करायची ती जागा उघडी केली जाते. जरूर असेल तर त्या जागेवर शॉटक्रीट (फवारलेले काँक्रीट)चे लेप चढवले जातात. तसेच बोगद्याच्या वरच्या भागातील प्रस्तराची ताकद

वाढविण्यासाठी त्यात जरूरीप्रमाणे लोखंडाच्या कांबी (रोड फोरपोलस) किंवा लोखंडी पाईप घुसवले जातात. त्यानंतर बोगद्याचे खोदकाम सुरू केले जाते.

बोगद्याचे खोदकाम करण्याचे एक तंत्र म्हणजे सुरुंगाचा वापर न करता खोदकाम करणे आणि दुसरे सुरुंगाचा वापर करून खोदकाम करणे. सुरुंगामुळे निर्माण होणाऱ्या कंपनामुळे आसपासच्या बांधकामांना धोका पोचू शकतो. त्यामुळे, जेव्हा बोगदा निवासी भागात तसेच महत्त्वाच्या बांधकामाच्या आसपास निर्माण करावयाचा असतो तेव्हा सुरुंगाचा वापर न करता खोदकाम करावे लागते. बोगद्याच्या आत ज्या पृष्ठभागावर खोदकाम चालते त्याला चेहरा (वर्किंग फेस) म्हणतात. खोदकामासाठी प्राचीन काळी छिन्नी व हातोडा यांचा वापर केला जाई. कालांतराने यंत्रांच्या साहाय्याने प्रस्तरात भोके पडून त्यात पाचर मारून किंवा फुलणारी रसायने भरून प्रस्तर तोडला जाऊ लागला. गेल्या तीन चार दशकात 'रोडहेडर' या मशीनचा उपयोग केला जात आहे. या मशीनमध्ये रणगाड्यासारख्या ढाच्यावर उभारलेल्या सोंडेच्या (बूमच्या) टोकावर एक फिरते चक्र असते. या चक्राच्या पृष्ठभागावर टंगस्टन कार्बाईड या अतिशय कठीण धातूचे टोकदार सुळके बसवलेले असतात. हे फिरते चक्र प्रस्तराच्या चेहऱ्यावर दाब देवून फिरवल्यावर प्रस्तराचे तुकडे होवून खाली पडतात. अशा तऱ्हेने ते चक्र बोगद्याच्या सबंध चेहऱ्यावर फिरवून बोगदा खणला जातो. यापेक्षाही मोठे यंत्र म्हणजे बोगद्याच्या आकाराचे भोक पडणारे यंत्र (टी.बी.एम. - टनेल बोअरिंग मशीन) 'रोडहेडर'ने कोणत्याही आकाराचा बोगदा खणता येतो. पण टी.बी.एम.ने फक्त गोल आकाराचाच बोगदा खणता येतो. टी.बी.एम.चा मुख्य भाग म्हणजे संपूर्ण बोगद्याच्या चेहऱ्याच्या आकाराचे फिरणारे चक्र. या चक्राच्या पृष्ठभागावर टंगस्टन कार्बाईड या अतिशय कठीण धातूचे टोकदार सुळके बसवलेले असतात. फिरते चक्र प्रस्तराच्या चेहऱ्यावर दाब देऊन फिरवल्यावर प्रस्तराचे तुकडे होऊन खाली पडतात आणि बोगदा खणला जातो. टी.बी.एम. चा बोगदा खणण्याचा वेग इतर तंत्रांच्या तुलनेत दोन ते तीन पट जास्त असतो पण त्याचा उत्खननाचा खर्च इतर तंत्रांच्या तुलनेत कैक पटीने जास्त असतो. रस्त्याच्या बोगद्यांसाठी गोल आकाराचा बोगदा हा सोयीचा नसतो. त्यामुळे टी.बी.एम.चा वापर रस्त्याच्या बोगद्यांसाठी प्रचलित नाही.

रस्त्याच्या बोगद्यांच्या कामासाठी प्रचलित तंत्र म्हणजे सुरुंगाचा वापर करून खोदकाम करणे. हे तंत्र 'कन्व्हेशनल मेथड ऑफ ड्रिलिंग ॲन्ड ब्लास्टिंग - डी.बी.एम.' म्हणून संबोधिले जाते. या तंत्रात बोगद्याच्या चेहऱ्यावर यंत्रांच्या साहाय्याने पूर्वनिश्चित जागांवर आणि पूर्वनिश्चित व्यासाची आणि खोलीची भोके पाडली जातात. या भोकात पूर्वनिश्चित वजनाच्या स्फोटात द्रव्याच्या कांड्या व विजेवर चालणाऱ्या स्फोट घडवणाऱ्या कांड्या घुसवल्या जातात. या स्फोट घडवणाऱ्या कांड्यांतून बाहेर निघालेल्या विजेच्या तारा एकमेकांना आणि शेवटी विजेच्या भारवाहक तारांना जोडल्या जातात. या भारवाहक तारातून विजेचा प्रवाह सोडून स्फोट घडवला जातो. या स्फोटामुळे बोगद्याच्या चेहऱ्यामागचा प्रस्तर उखडून फेकला जातो आणि बोगद्याचा चेहरा पुढे सरकतो. हा उखडून निघालेला माल यांत्रिक अवजारांनी, वाहतूक करणाऱ्या वाहनात चढवून, बोगद्याबाहेर टाकला जातो.

प्रत्येक प्रस्तरात स्वतःच्या ताकदीवर उभे राहाण्याची क्षमता असते. ही क्षमता त्यातील उभे आणि आडवे जोड, दमटपणा आणि प्रस्तराचा मजबूतपणा इत्यादी गुणधर्मांवर अवलंबून असते. अगदी कमकुवत प्रस्तरात सुद्धा काहीशी क्षमता असते. या क्षमतेला गतीशील करून, उघड्या झालेला बोगद्याचा परीघ, अंतर्गत जुळवाजुळव करून, जरूर तर झुकून किंवा आकार बदलून या नव्या स्थितीत समतोल साधतो. या बदलांना मर्यादेत ठेवून, प्रस्तराची उभे राहाण्याची क्षमता बाहेरून आधार देऊन जरूर तेवढी वाढवणे आणि स्थिर असा बोगदा बांधणे या उद्देशाने गेल्या काही दशकांपासून बोगदे बांधण्यासाठी 'न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड (एन.ए.टी.एम) चा वापर केला जात आहे. ही बोगदे बांधण्याची कार्यपद्धती नसून तत्त्वज्ञान (फिलॉसॉफी) आहे. बोगद्याची उभे राहण्याची क्षमता जरूर तेवढी वाढवण्यासाठी नवीन उघड्या झालेल्या बोगद्याच्या परिघात जाड लोखंडी खिळे (रॉकबोल्टस) मारले जातात. या खिळ्यांमुळे परिघातला प्रस्तर एकत्र बांधला जातो. याशिवाय या परीघावर जरूर असेल तेव्हा व तेवढ्या जाडीचे शॉटक्रिटचे थर फवारले जातात. जिथे प्रस्तर कमकुवत असतो अशा जागी बोगद्याच्या आकारात वाकवलेल्या लोखंडी तुळ्या (बीमस) बाहेरून उभ्या करून त्यावर काँक्रिटचे अस्तर (लायनिंग) चढवले जाते.

वरील वर्णनावरून बोगद्याचे बांधकाम हे खूप सोपे असते असा गैरसमज होऊ शकतो. दक्षिण पठारामधील डोंगरातल्या बोगद्यांच्या बाबतीत हे बहुतांशी खरे आहे. सध्या हिमालयात बऱ्याच रस्त्याच्या बोगद्यांची कामे चालू आहेत. नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया - 'एन.एच.,ए.आय.' (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण) यांच्या धोरणानुसार सर्व राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गावरील मोठे पूल आणि बोगदे साधारणपणे कमीतकमी तीन मार्गीकांसाठी बांधावे लागतात. जिथे वाहतूक अगदीच कमी असते ते भाग याला अपवाद असतात. हिमालयातील बराच भाग ठिसूळ कमकुवत प्रस्तरांचा आहे. अशा प्रस्तरातून १५ मीटर रुंद बोगदा काढणे ही खरी कसोटीची गोष्ट असते. उंच डोंगराखालून जाणाऱ्या बोगद्यात बऱ्याच जागी हा प्रस्तर फुलू लागतो आणि त्याचे ढलपे कोसळून पडतात. हे शॉटक्रिटचा थर फवारून थांबवावे लागते. यासाठी रिमोट कंट्रोल्ड मशीन्स

वापरावी लागतात. उघड्या झालेल्या बोगद्याचा परीघ, अंतर्गत जुळवाजुळव करून, जरूर तर झुकून किंवा आकार बदलून या नव्या स्थितीत समतोल साधण्याची प्रक्रिया काही महिन्यांपर्यंत चालू राहाते. या काळात बोगद्याच्या परिघात ठराविक जागी निशाणाच्या खुंट्या (टार्गेटस) लावून इलेक्ट्रॉनिक साधनांच्या साहाय्याने मापे घेऊन आणि त्यांचे मूल्यमापन करून जरूर तेवढे आणखी रॉकबोल्टस आणि शॉटक्रिटचे थर फवारून ही आकार बदलण्याची क्रिया हळूहळू थांबवून परत एकदा समतोल निर्माण केला जातो. हिमालयातील बोगद्यांचे बांधकाम कसे अवघड असते आणि त्यात काय काय अडचणी येतात हे यापुढे दिलेल्या उदाहरणावरून समजून येईल.

नुकताच कार्यरत झालेला काश्मिरमधील राष्ट्रीय महामार्ग ४४ वरील चेनानी व नाशरी या गावांना जोडणाऱ्या पटनीटॉप डोंगराखालून जाणाऱ्या ९.२ कि.मी. लांब बोगद्याचे काम असेच अवघड काम होते. या प्रकल्पात ४.५ मी. रुंदीच्या दोन मार्गिका असलेला ९.२ कि.मी. लांबीचा मुख्य बोगदा आणि तेवढ्याच लांबीचा आपत्कालीन वापराचा छोटा बोगदा याचा समावेश आहे. मुख्य बोगदा सुमारे १२ मी. रूंद व १० मी. उंच आहे. हे बोगदे सुमारे २,४०० मी. उंचीवरील नाथाटॉप या शिखराच्या १,२०० मी. खालून जातात. मुख्य बोगदा आणि आपत्कालीन वापराचा छोटा बोगदा यांच्यामध्ये सुमारे ५४ मी. अंतर असून ते दर ३०० मी. अंतरावरील आडव्या बोगद्याने जोडले गेले आहेत. हे बोगदे जमिनीच्या खाली खूप खोलीवर असल्यामुळे भोके पाडून बोगद्याच्या जागेचे प्रस्तराचे नमुने फक्त बोगद्याच्या तोंडाजवळील भागातच शक्य झाले. त्यामुळे बोगदा काय तऱ्हेच्या प्रस्तरातून जाईल याचे अनुमान करण्यासाठी भूगर्भशास्त्रज्ञांना डोंगरावर फिरून पृष्ठभागावर दिसून येणाऱ्या भूरचनेतील वैशिष्ट्यांचा अभ्यास तसेच त्यांचा स्वतःचा अनुभव आणि कुशाग्रबुद्धी याचा वापर करावा लागला. हे बोगदे कठीण ते कमकुवत सँडस्टोन (वाळूचा खडक), क्लेस्टोन (चिकन मातीचा खडक) आणि सिल्टस्टोन (गाळापासून बनलेला खडक) यातून आणि दोन ठिकाणी ५० ते ६० मी. लांबीच्या प्रस्तरभंग (फॉल्ट) आणि ठेचलेल्या (क्रश्ड) भागातून जात होते. काही भागातील प्रस्तर हा फुलणारा (स्वेलिंग) आणि चिरडलेला (स्क्वीझिंग) होता. त्याचे ढलपे कोसळून पडत. ते थांबवण्यासाठी दूर उभे राहून काँक्रिटचे थर फवारण्यासाठी 'रिमोट कंट्रोल्ड शॉटक्रिट मशीनस' वापरावी लागली. सारख्या बदलत जाणाऱ्या प्रस्तरामुळे, वेळोवेळी काम करण्याची पद्धत बदलावी लागली. सर्व काम 'न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड (एन.ए.टी.एम.)'च्या तत्त्वज्ञानावर (फिलॉसॉफी), 'कन्व्हेशनल मेथड ऑफ ड्रिलिंग अ‍ॅन्ड ब्लास्टिंग - डी.बी.एम.' ने केले गेले.

एवढा खटाटोप करून उंच डोंगराखालून जाणाऱ्या अशा बोगद्यामुळे वाहतूक कशी सुकर होते ते यापुढे दिलेल्या उदाहरणावरून समजून येईल. काश्मिरमधील राष्ट्रीय महामार्ग ४४ चा जम्मू - श्रीनगर यामधील काही भाग पटणीटॉप या उंच डोंगरातून जातो. हा रस्ता अरुंद असून त्यात बरीच नागमोडी वळणे आहेत. या डोंगराच्या दोन बाजूस वसलेली चेनानी आणि नाशरी ही गावे एकमेकांपासून ४१ कि.मी. अंतरावर आहेत. या प्रवासात वाहनांना ८०० मी. चढ आणि ८०० मी. उतार पार करावा लागत असे आणि या ४१ कि.मी. प्रवासास दोन ते तीन तास वेळ लागत असे. दरवर्षी पावसाळ्यात भूस्खलनामुळे आणि हिवाळ्यात बर्फामुळे सुमारे चार महिने हा रस्ता बंद असे. आता चेनानी आणि नाशरी या गावादरम्यान ९.२ कि.मी. लांबीचा आशिया खंडातील सर्वात लांब बोगदा कार्यरत झाला आहे, या गावातील अंतर फक्त १० कि.मी. झाले आहे आणि हा प्रवास फक्त १२ मिनिटाचा झाला आहे. तसेच पावसाळ्यात आणि हिवाळ्यातसुद्धा वाहतूकीसाठी उघडा राहील. ३१ कि.मी. अंतर कमी झाल्यामुळे आणि ८०० मी. चढउतार वाचल्यामुळे दररोज २७ लाख रुपयांचे इंधन वाचत आहे.

काश्मिरमधील एक महत्त्वाचा महामार्ग म्हणजे श्रीनगर आणि लडाखमधील लेह या शहरांना सोनमर्ग, द्रास आणि कारगिलद्वारे जोडणारा एन.एच.१ डी. 'सिंध' नदी (सिंधू नव्हे) गुमरी हिमनदीत उगम पावते आणि सोनमर्ग, कांगन व वायुल गावातून वाहत जाऊन गंदरबलमध्ये झेलम नदीला मिळते. वायुल ते सोनमर्ग या भागात एन.एच.१ डी सिंध नदीच्या उजव्या किनाऱ्यावरील उभ्या कड्यांच्या पायथ्याच्या जवळून जातो. हिवाळ्यात बर्फाचे रूपांतर हिमनद्या आणि कोसळणाऱ्या हिमकड्यात होते आणि रस्ता जवळजवळ चार महिने बंद होतो. सोनमर्गजवळ सध्या निर्माण करण्यात येत असलेला ६.५ कि.मी. लांब 'झेड मोर' बोगदा या हिमनद्या आणि कोसळणाऱ्या हिमकड्यांच्या खालून जाणार आहे. त्यामुळे श्रीनगर ते सोनमर्ग हा रस्ता वाहतुकीसाठी हिवाळ्यातसुद्धा उघडा राहील.

साधारण २,८०० मी. उंचीवरील एन.एच.१ डी ३, ५२८ मी. उंचीवरील झोजीला (झोजी खिंड) कडे चढू लागतो. तिथून हा रस्ता प्रथम लडाखमधील द्रास (उंची ३,२८० मी.) व नंतर कारगिल (उंची २,६७६ मी.) ला उतरतो. सैबेरिया नंतर द्रास हे जगातील सर्वात थंड लोकवस्तीचे गाव आहे. हिवाळ्यात झोजीलामध्ये जवळजवळ ५० फूट बर्फ पडतो. बर्फ काढून व रस्ता दुरुस्त करून वाहतूक चालू करण्याचा वेळ जमेत धरल्यास दरवर्षी हा रस्ता वाहतुकीसाठी फक्त सहा महिने उपलब्ध होतो. सोनमर्ग आणि द्रास कारगिल यांना जोडणारा, वाहतुकीस वर्षभर उपलब्ध राहील अशा प्रस्तावित रस्त्याचे काम सन २०१७ मध्ये चालू होईल. यामध्ये झोजीला खाली १४.४ कि.मी. लांब दुपदरी दुमार्गी बोगदा आणि १०,८०० मी. लांब रस्ते निर्माण करायचे आहेत. हे काम पूर्ण होण्यास जवळजवळ ७ वर्षे लागतील.

जसे जसे प्रस्तावित रस्ते वापरात येतील तसे तसे काश्मिरचे दुर्गम भाग व त्यातील लोक एकत्र बांधले जातील. सैन्याची हलवाहलव सोपी होईल व सीमा रेषांवरील लष्करी चौक्यांची ताकद वाढेल.

सध्या जगातील सर्वात लांब रस्त्याचे सहा बोगदे खालीलप्रमाणे आहेत :

| | |
|---|---|
| नॉर्वेतील लारेडाल बोगदा | २४.५१ कि.मी. |
| जपानमधील यामते बोगदा | १८.२० कि.मी. |
| चीन मधील झोंगांनशान बोगदा | १८.४० कि.मी. |
| चीनमधील जिंगपिंगशान बोगदा | १७.५४ कि.मी. |
| स्वित्झर्लंड मधील सेंट गॉट्हार्ड बोगदा | १६.९२ कि.मी. |

भविष्यात आपल्या काश्मिरमधील १४.४० कि.मी. लांब झोजीला बोगद्याचा पण या यादीत समावेश होईल.

काही महिन्यापूर्वीपर्यंत आतंकवादी आणि फुटीरतावादी गट विकासाच्या कामांना त्रास देत नव्हते. त्यांची विचारसरणी अशी असावी की भविष्यात दोन्ही काश्मिर मिळून निराळा देश झाला किंवा भारताच्या ताब्यातील काश्मिर पाकिस्तानशी जोडले गेले तर चांगला विकास झालेला काश्मिर त्यांना मिळेल. पण आता त्यांचा अशा कामांना विरोध आहे. काश्मिरी जनता या सुधारणांवर खूश आहे. पण आतंकवादी आणि फुटीरतावादी गटांना भीती वाटत आहे की चेनानी नाशरी बोगद्यांसारख्या सोयीमुळे काश्मिरी लोक इतर भारतीयांच्या नुसते अंतराने किंवा वेळ वाचल्यामुळे नाही तर मनाने जवळ येतील. ❖

# आईची अपार माया

**श्री. गुरुनाथ मराठे, बोरिवली**



‘आईसारखं दैवत साऱ्या जगतावर नाही’ हे गाणं आठवलं की आम्हा तिन्ही भावंडांच्या डोळ्यासमोर उभी राहाते ती आमच्या आईची वात्सल्यमूर्ती! आज ती या जगात नसल्यामुळे तिच्या आठवणीमुळे मन व्याकुळ होतं. तसं पाहिलं तर आम्हाला आई-वडिलांचा सहवास फारसा लाभला नाही. भावंडामध्ये मी सर्वात लहान. माझ्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी प्रथम वडिलांचं (अण्णाचं) निधन झालं. वडिलांच्या पश्चात आई मोठ्या उमेदीने आमच्यासाठी जगली खरी पण तीसुद्धा मनाने फार खचली होती. त्यानंतर चारच वर्षांनी ती आम्हाला सोडून गेली. आमची आई स्वभावाने अतिशय शांत, नम्र. तिच्या प्रेमळ स्वभावामुळे तिने कॉलनीमध्ये अनेक माणसं जोडली होती. ती आम्हाला कधीही ओरडली अथवा रागावली नाही. उलट आमच्या चुका पोटात घालून आम्हाला माफ केलं. आमची आई स्वयंपाकात अतिशय सुगरण होती. कैरीचं लोणचं किंवा फोडणीची मिरची आजुबाजूचे लोक आईकडून करून घेत. आमचे वडील मात्र अतिशय करड्या शिस्तीचे होते. सकाळी ५.३० वाजता उठलंच पाहिजे, अशी त्यांची शिस्त असे. हाक मारूनसुद्धा आम्ही उठलो नाही तर पाच बोटं आमच्या मांडीवर उठत असत. संध्याकाळी सातच्या आत आम्ही घरात आलंच पाहिजे आणि हातपाय धुवून रामरक्षा म्हटलीच पाहिजे अशी त्यांनी आम्हाला शिस्त लावली होती.

आमचे वडील हलाखीतून वर आले होते. मुंबईला आल्यावर त्यांनी शून्यातून संसार उभा केला. त्यांनी संसारासाठी किंवा आम्हाला काहीच कमी पडू दिलं नाही किंवा तसं जाणवूही दिलं नाही. आम्हा तिघा भावंडांमध्ये कधीच भेदभाव केला नाही. १९७६ साली अण्णा गेले आणि आमच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. पण आईने ते दुःख पचवून आम्हाला सावरलं. पुढे चार वर्षांनी आईने अल्पशा आजाराचं निमित्त होऊन ऐन दिवाळीत या जगाचा निरोप घेतला. माझ्या दोन्ही भावांनी पुढील जबाबदारी समर्थपणे पेलली. ज्या आई-वडिलांनी आमच्या जीवनाला दिशा दिली, आमचं भवितव्य घडवलं त्या आई-वडिलांचे आभार मानणं बरोबर नाही. पण त्यांच्या ऋणातून थोडंफार उतराई होण्यासाठी या लेखाद्वारे केलेला हा छोटासा प्रयत्न. ❖

**सुविचार**

**सर्व कालकृतं मन्ये भवतां च यदप्रियम्। सपालो यद्वशे लोको वायोरिव घनावलिः।। - श्रीमद्भागवत १.९.१४**

***अर्थ*** : (नारदमुनी म्हणतात, पांडवहो) आपणाला आतापर्यंत जे दुःख भोगावे लागले तर खरोखर काळाच्या सपाट्यात सापडल्यामुळेच सोसावे लागले असे मला वाटते. ज्याप्रमाणे मेघ हे वायूच्या ताब्यात असतात, त्याप्रमाणे लोकपालांसह सर्वजग काळाच्या ताब्यात आहे.

# संवाद कुलबांधवांशी

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**नमस्कार कुलबांधव आणि भगिनींनो,**

नवीन आर्थिक वर्षातील हा पहिलाच संवाद. मागील अंकामध्ये आपण अगोदरच्या वर्षात केलेल्या उल्लेखनीय गोष्टींचा आढावा घेतला होता. त्यावेळी म. प्र. च्या वाढीसाठी आपणास सहभागी होण्यासाठी आवाहन केले होते. हळूहळू प्रतिसाद मिळत आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत आपले परिवारातील स्त्री पुरुष उल्लेखनीय कामगिरी करत असून आपला संवाद वाढल्याने लगेच या घटना सर्वांपर्यंत पोहोचत आहेत. आपल्या व्हाटस्अँप व फेसबुक समुहाद्वारे बरेच कुलबांधव एकमेकांच्या संपर्कात आले असून याचा खुपच फायदा होत आहे. एकमेकांना भेटत आहेत. एकमेकांच्या मदतीला धावून जात आहेत. कोणी कुटुंबातील आजारी असल्यास अथवा काही आवश्यकता पडल्यास ग्रुप वर टाकल्यास लगेच प्रतिसाद मिळतो. हेच आम्हाला अपेक्षित आहे.

आता मुलांचे दहावी, बारावी व पदवीचे निकाल जाहीर होण्याची वेळ जवळ आली आहे. आपणा सर्वांची ही जबाबदारी आहे की या मुलांचे यश आमच्या पर्यंत पोहोचवणे. तसेच त्यांचे कौतुक होणेही गरजेचे आहे. याच अंकामध्ये आपल्याकडून देण्यात येणार असलेल्या पारितोषिकाचे सविस्तर विवेचन दिले असून या मध्ये बसणाऱ्या मुलांचे अर्ज लवकरात लवकर आमच्याकडे पाठविण्यात यावेत. म्हणजे सर्व मुलांचे कौतुक करता येईल.

तसेच ज्या मुलांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती पाहिजे असेल अशा मुलांना अर्ज करण्यासाठी आपणच उद्युक्त करावे. जेणेकरून गरजू मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात रहाता येईल.

आपल्यापैकी बरेच जण या उन्हाळ्यात वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला गेले असाल. त्यावेळी आपल्याला नवनवीन लोक भेटले असतील, त्यातच काही मराठेसुद्धा असतील. काही जुने नातेवाईक किंवा मित्रमंडळी नव्याने भेटले असतील. काही जुन्या ठिकाणी नव्याने भेट दिली असेल. कोणी कुलदेवतेला गेला असाल. कोणी कुटुंबातील सदस्यांबरोबर गेले असाल तर कोणी मित्रमंडळींच्या सोबत हुंदडले असाल. कोणी देशात तर कोणी परदेशी प्रवास केला असेल. अशा सगळ्या वेगवेगळ्या अनुभवांची शिदोरी आपल्याकडे जमा झाली आहे ती उघडा व आमच्या कडे पाठवा. आपल्या 'हितगुज'च्या संपादिका त्याला योग्य तो न्याय देतील.

नवीन आर्थिक वर्षात सरकारने आयकरात बरेच उल्लेखनीय बदल केले आहेत. तसेच बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जीएसटी ची अंमलबजावणी १ जुलै पासून सुरू होत आहे. जीएसटी चा उद्देश कररचना सुटसुटीत करणे हा होता मात्र सध्या त्यावर येणारे लिखाण पाहिल्यानंतर यात खूपच क्लिष्टता आहे असे एकंदरीतच दिसते. यावर आपल्या परिवारातील या विषयातील तज्ज्ञ मंडळी प्रकाश टाकू शकतील. तेव्हा आपणापैकी ज्यांना शक्य असेल ते अवश्य लिखाण पाठवू शकतात.

आता पावसाचे आगमन होणार असून सृष्टीचा चेहरा मोहरा बदलणार आहे. तसेच सणासुदीला सुरुवात होणार यासाठी आपणास शुभेच्छा. आता आपली भेट सप्टेंबरला. अच्छा।

❖

## *Definitation of Time*

| | |
|---|---|
| **SLOW** | When you wait |
| **FAST** | When you are late |
| **SHORT** | When you are happy |
| **LONG** | When you feel bored |
| **DEADLY** | When you are sad |
| **ENDLESS** | When you are in pain |

Time is determined by feelings and your psychological conditions, not by blocks so have a Nice time Always.

# श्रीमाणिक प्रभू (एक दत्तावतार)

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, (पृ. १२०) दूरध्वनी –०२२– २४१५०८८९

***दिडशे वर्षांपूर्वी सकलमत संप्रदायाची स्थापना करणारे महान दत्तभक्त संतश्री माणिक प्रभू यांचे यंदा द्विशताब्दि वर्ष आहे. त्यानिमित्ताने श्रीमाणिकप्रभू अेक दत्तावतार हा लेख प्रकाशित करून औचितय साधले आहे.***

**श्री** माणिक प्रभू (शके १७३९–१७८७)

माणिक प्रभू हे कल्याणीच्या आश्वलायनशाखीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण श्री. मनोहर नाईक यांचे पुत्र होत. त्यांच्या मातेचे नाम बयमा अथवा बयाबाई होते. श्री. माणिक प्रभूंचा जन्म मार्गशीर्ष शु. १४ शके १७३९ मध्ये लाडवंती या गावी झाला.

श्रीदत्तात्रेयांचे जे सहा अवतार महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत त्यापैकी श्री. माणिक प्रभू हे चौथे अवतार समजले जातात. १) कुरवपुरीचे श्रीपाद श्रीवल्लभ २) गाणगापुरीचे श्रीनृसिंह सरस्वती ३) अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ ४) मणिकपूरचे, हुमणाबादचे श्री माणिक प्रभू ५) शिरडीचे साईबाबा ६) नर्मदातटाकी गरुडेश्वरी समाधिस्त होणारे श्री. वासुदेवानंद सरस्वती.


माणिक प्रभूंच्याही पूर्वी मराठवाड्यात दासोपंत हे दत्तावतार होऊन गेले. त्यांच्या दत्तसंप्रदायात जे सोळा अवतार मानले जातात त्यात या सहा अवतारांची नावे आढळत नाहीत, अथवा दासोपंतांचे नाव या सहा अवतारांमध्ये सापडत नाही. वस्तुतः दासोपंतांचे ही नाव या अवतारात येणे आवश्यक आहे. कदाचित साम्प्रदायिक अभिमानामुळे त्यांचे नाव या सहा अवतारांमध्ये सापडत नसावे. यामुळे दत्तसंप्रदायात दत्तावतारांबद्दल एकवाक्यता आढळत नाही.

सर्व दत्तावतारात माणिकप्रभू हे फार ऐश्वर्य संपन्न, श्रीमंत असे राजयोगी होते. लहानपणापासून त्यांच्या अंगावर सोने, मोती, हिरे, माणके यांचे अलंकार असत. प्रभूंच्या द्वारी हत्ती, घोडे, पालख्या, राजेरजवाडे झुलून राहिले होते. इतके झाले तरी माणिकप्रभूंची वृत्ती फकिरी बाण्याची, स्वतंत्र व आनंदी अशी कायमची होती. ऐश्वर्यामुळे त्यांच्या नम्र व दयाळू वृत्तीत काडीइतकाही फरक पडला नाही. त्यांचे भाषण फार गोड, खुबीदार, दयेने परिपूर्ण व विनोदी असे. ते मोठे वक्ते, चतुर, समयज्ञ आणि अनेक भाषाभिज्ञ होते. संस्कृत, कानडी, तेलंगी, उरदू, फारसी, हिंदुस्थानी, महाराष्ट्री इतक्या भाषा त्यांना अगदी येत. परंतु हे अध्ययन त्यांनी कधी, कोठे केले याचा कोणास पत्ता नव्हता, कोणी कोणत्याही मताचा, धर्माचा आणि कोणत्याही जातीचा आला तरी प्रभूपुढे बोलण्यास व वाद करण्यास तो टिकत नसे. ते सर्वधर्मशास्त्रपारंगत आणि वेदज्ञही होते.

श्रीमाणिक प्रभू यांनी आपले कार्य प्रामुख्याने मराठवाड्यात केले. त्यांनी आपल्या माणिक नगरच्या गादीची स्थापना १८४५ साली केली. आपल्या नावाचे गावनिर्माण करून तेच स्थळ कायमवस्ती करण्यासाठी योग्य म्हणून त्यांनी का निवडले या विषयी पुढील कथाख्यिया सांगण्यात येते.

कोणी एक गृहस्थ आपल्याबरोबर बायकामुले घेऊन कल्याणी येथे माणिक प्रभूंच्या दर्शनाला चालले होते. हुमणाबाद आणि गडवंती गावाच्या मधल्या अरण्यात ते येऊन पोहोचले, तेथे एक जुनाट शिवालय व कुंड होते. भोवताली दाट, गर्द झाडी असून वाटसरू लोकांस लुटण्याची व ठार मारण्याची ही जागा होती. शिवालयात जिकडेतिकडे हाडे पडलेली असून पूजाअर्चा मुळीच होत नव्हती. नेहमी चोरटे आरब व रोहिले लोक येथे दडून राहून वाटसरूंचे वित्त व जीवन हरण करीत असत. अशा या स्थळी त्या गृहस्थांवर व त्याच्या मंडळींवर या चोरट्यांनी हल्ला केला! त्यांचे वित्त लुबाडून त्यांचे प्राण घेण्यासही हे चोरटे तयार झाले. सर्व बायकामुले एकमेकांच्या गळ्यात पडून रडायला लागली. सर्वत्र एकच गोंधळ, हाहाकार उडाला! चोरट्यांनी मारण्यास आरंभ केला तेव्हा सर्व मंडळींनी प्रभूंचा धावा करण्यास आरंभ केला! तेव्हा संकटसमय जाणून भक्ताकरिता प्रभू एकाएकी तेथे प्रकट झाले! प्रभूंचे रूप यावेळी फार मजेदार होते. ते असे की डोकीस भरजरी मंदीलाची हैद्राबादी कळी (पागोटे) अंगात भरजरी शालनाम्याचा झुबा, कंबरेस हिरवा भरजरी शेला, गळ्यांत हिऱ्याच्या व मोत्याच्या कंठ्या, कानात चौकडा, हातांत पोची व दुसरे हातात गुडाखु पिण्याचा नैचा, पाठीशी ढाल, कंबरेस तमंच्या व बिचवा, गळ्यात भरजरी किनखापी पठ्यात अडकविलेली सुरेख तरवार, कपाळी भव्य सुंदर केशरी गंध आणि मध्ये कस्तुरी तिलक असे रूप धारण करून प्रभू एकाएकी तेथे शिवालयात चौटाऱ्यावर प्रगट होऊन नैचा पीत बसले!

माणिक प्रभूंस पाहाताच चोरांनी विचार केला की, या गरिबास मारण्याच्या खटपटीत पडून वेळ मोडावा त्यापेक्षा त्या श्रीमंत गृहस्थास मारून मोठी लूट मिळवावी हे चांगले! असे म्हणून सर्व जण प्रभूचे अंगावर धावले आणि हात वर करून शस्त्रे मारू लागले, तेव्हा ज्यांनी ज्यांनी मारण्यास हात वर केले होते त्यांचे त्यांचे हात वरतीच राहिले! खाली येईनात



कोणी डोकी वर केली होती त्यांची डोकी खालीच येईनात! 'जैसे थे'' या अवस्थेत सर्व राहिले, सर्वांचा मुख्य जमादार होता त्याच्या पोटात मोठा शूल उठला! तो गडबडा लोळू लागला. इतरांचे हातपाय गळाले. एवढ्यात प्रभूंनी उग्ररूप धारण करून चोरट्याच्या दाढीमिशा उपटण्यास प्रारंभ केला. त्यांच्यापैकी एकाने हे कल्याणकर प्रभू असल्याचे ओळखून सर्व मारेकरी श्रीप्रभूंच्या पायावर लोळू लागले त्यांना शरण जाऊन म्हणाले, ''प्रभूंची ह्यामुळे कधी बेअदबी करणार नाही आणि प्रभूंची तलूक (द्वाही) आजपासून आम्ही व आमच्या पिशाबींचे (वंशज) सर्वजण फिरवू.'' मग सर्वांचे हातपाय व्यवस्थित नीट झाले. जमादाराचा पोटशूलही राहिला. प्रभूंनी त्या दिवसापासून आपले नेहमी राहाण्याचे ठिकाण करून पुढे समाधिकाळपर्यंत भक्तजनाचा उद्धार करीत ते तेथेच राहिले. जेथे पूर्वी वाटसरूंचे रक्ताचे सडे पडत असत तेथे भक्तांकरवी हजारो लोकांच्या पंक्ती उठून तुपाचे पाट वाहू लागले आणि भयाण रानात 'नित्यश्रीनित्यमंगल' होऊ लागले. शिवालयात चोरट्याच्या हातून प्राणदान मिळालेल्या ब्राह्मण कुटुंबाचे दारिद्र्यही प्रभूंनी कायम नाहीसे केले. माणिकप्रभूंनी आपल्या अंगांतील चमत्कारशक्तिचा उपयोग चांगल्या साठी केला.

स्वतः माणिकप्रभूंनी आपल्या दत्तोपासनेच्या परंपरेला 'सकलमत संप्रदाय' हे नाव दिले. या संप्रदायांत समन्वयाचा मोठा प्रयत्न झालेला आहे. या संप्रदायाचा सिद्धान्त असा की, जगातील सर्व धर्म व संप्रदाय हे त्यांच्या त्यांच्या अनुयायांना परमेश्वराची प्राप्ती करून देणारे आहेत. तेव्हा प्रत्येकाने अन्य संप्रदायांना विरोधी वा त्याज्य न मानता समन्वयाच्या उदार दृष्टीने त्यातील सत्वांश ग्रहण करावा.

श्रीमाणिकप्रभूंचा 'सकलमत' हा अगदी सोपा आणि प्रासादिक शब्द सध्याच्या 'सर्वधर्मसमभाव' ह्या बोजड शब्दातील साऱ्या अर्थापेक्षा अधिक काहीतरी सांगून जाणारा आणि अंतःकरणाला भिडणारा असा आहे. 'सकलमत' ह्या अक्षराच्या योजनेवरूनच माणिकप्रभूंची साहित्यिक थोरवीची कल्पना यावी. हा संप्रदायही केवळ हिंदूपुरताच मर्यादित नाही. हिंदूमुसलमान ह्या सकृत्दर्शनी विरोधी वाटणाऱ्या धर्मांतील अनुयायांना एकाच पूजास्थानावर आणण्याचे कार्य श्रीमाणिकप्रभूंनी केले आहे. विशेष म्हणजे श्रीमाणिकप्रभूंनी हे कार्य ज्या मराठवाड्यात ज्या काळात केले तो प्रदेश त्यावेळी निजामीप्रदेश म्हणून गणला जात होता. त्या भागात त्या काळात इस्लामधर्मीय नेत्याच्या आणि जेत्याच्या भूमिकेत वावरत होते. अशा परिस्थितीत त्यांनाही आपलेसे करणे आणि एका परधर्मीय श्रद्धास्थानाकडे सहिष्णुतेने पाहायला लावणे हे अत्यंत बिकट असे 'अवतारी' कार्य श्रीमाणिकप्रभू यांच्या हातून पार पडले आहे.

प्रभूंच्या भाषणाची छाप परधर्मीयावर पडत असे. हुमणाबादेत गुलाम मुस्तफाखा नावाचा तालुकादार होता. त्याचा अंमल कडक असे, प्रभूंची कीर्ति ऐकून तो दर्शनास आला. बराच वेळ प्रभूंशी संभाषण झाल्यावर तो अत्यंत खूष झाला. असा 'वली' जगात सापडणे कठीण अशी त्याची खातरी झाली. तो प्रभूंना मोठ्या विनयाने व आदराने म्हणाला, 'महाराज आपण मुसलमान असता तर मी ह्याच क्षणी आपला शिष्य बनलो असतो.'' यावर प्रभू हसून म्हणाले, ''होय हो, मलाही मुसलमान व्हावे असे वाटते पण काय करू? ''रब-उल-आलमीन' असे अल्लाला कुराणात म्हटले आहे हे मला ठाऊक आहे. पण 'रब-उल-मुसलमीन' असे म्हटले असल्याबद्दल मात्र कुराणात कोठेही दाखला सापडत नाही. तसे वचन कोठे असेल तर मला कळवा.

ह्या उत्तराने तो निरूत्तर होऊन आपल्या कोत्या समजूतीबद्दल ओशाळ झाला. हे उत्तर अत्यंत मार्मिक आहे. 'रब-उल-आलमीन' म्हणजे विश्वाचा अधिपती परमेश्वर हा विश्वाचा अधिपती आहे असे कुराण सांगते पण तो 'रब-उल-मुसलमीन' म्हणजे मुसलमानांचाच तेवढा अधिपती आहे असे वचन मिळाल्याशिवाय मुसलमान होऊन काय उपयोग? परमेश्वर मुसलमानेतर जगाचा वाली नसल्याचा दाखला कोत्या समजूतीशिवाय मिळणे शक्य नाही पण हटवादी लोक धर्मांध होऊन आपला धर्म चांगला व दुसऱ्याचा वाईट म्हणत असतात. अशा हटवादी लोकांना श्रीमाणिक प्रभूंनी याप्रमाणे समर्पक उत्तर दिलेले आढळते.

सकलमत संप्रदायाचे उपास्य श्रीचैतन्यदेव हे आहे. या संप्रदायाचे श्रीदत्तात्रेयाचे स्वरूप मधुमती नामक शक्तीसहीत आराधिले जाते. हा संप्रदाय अद्वैती व सर्वव्यापी असल्यामुळे अमक्याच एका देवतेचा मंत्र घेतला पाहिजे, असा त्यांचा आग्रह मुळीच नाही कारण आपले सद्‌गुरूच नानावेशांनी या जगात नटलेले आहेत, सर्व स्वरूपे त्यांचीच आहेत म्हणून बाह्यतः भेद दिसत असला तरीही वस्तुतः सर्व देवता एकरूपच आहेत, असा निश्चय ठेवून मंत्र घेतल्यास तो बाधक होणार नाही अशी शिकवण दिली जाते. प्रवृत्ती निवृत्ती हे दोन्ही मार्ग विरोधी नसून दोन्ही पूर्णपणे साधता येतात असा उपदेश श्रीप्रभू करीत असत. श्री माणिक प्रभूंच्या उपदेशाचे सार, 'श्रुतिधर्म रक्षुनि सकल मताते वंदा। सर्वातरी आत्मा, नको कुणाची निंदा।' हे होते.

या संप्रदायात 'श्रीभक्तकार्यकल्पद्रुम – गुरुसार्वभौम श्रीमद्‌राजाधिराज – योगीमहाराज – त्रिभुवनानंद – अद्वैत – अभेद – निरंजन – निर्गुण – निरालंब – परिपूर्ण – सदोदित – सकलमतस्थापित – श्रीसद्‌गुरु माणिकप्रभू महाराज की जय! असा जयघोष रूढ आहे. माणिक प्रभूंच्या गादीच्या परंपरेत श्री मनोहर माणिक प्रभू आणि श्रीमार्तंड माणिकप्रभू हे दोन पुरुष प्रसिद्धी पावले. माणिक प्रभूंच्या उदार धर्मधोरणामुळे हिंदु-मुसलमान, लिंगायत सर्व पंथाचे अनुयायी त्यांना मिळाले.

श्रीमाणिक प्रभूंना गायनाची आवड असून गायन कलेचे चांगले ज्ञान त्यांना होते. त्यांच्या दरबारात गायनाचे, संगीताचे, नृत्याचे कार्यक्रम होत असत. अनेक मोठमोठे गवय्ये, उस्ताद दरबारात हजेरी लावून जात. श्रीप्रभूंनी अनेक रागबद्ध रसाळ पदांची रचना केली आहे. त्यांनी कृष्णपर पदेही रचली आहेत. त्यांची पदे मराठी, हिंदी, कानडी भाषांमध्ये असून त्यांच्या गीतांना मीरापदावलीची माधुरी आहे. त्यांची काही पदे खालीलप्रमाणे –

*श्रीगुरू माझा दत्त दयाघन रे।*
*अंतरचालक त्रिभुवनपालक।*
*सकळांसी जीवन रे।*
*अखंड अगोचर व्याप्त चराचर।*
*शाश्वत चिद्‌घन रे।*
*माणिकदासासि मिळविले स्वरूपासी।*
*देऊनि उन्मन रे।।*

श्रीमाणिकप्रभूंचां दत्त दयाळू, त्रिभुवनपालक, सर्वांचे जीवन असणारा चराचरसृष्टीत व्यापून राहिलेला असा असून श्रीप्रभूंना त्यांनी उन्मनी अवस्थेत नेऊन स्वस्वरूपी मेळविले आहे. या अवस्थेत गेल्यावर श्रीप्रभूंना वाटते,

*आम्ही येथीचे तेथीचे।*
*वेद जाणती नेतीचे।।*
*आम्हां नाही येणे जाणे।*
*आम्ही पूर्णातीत पूर्ण।।*
*आम्हां गाव ठाव नाही।*
*ठावातीत सर्वां ठायी।।*
*आमचे नाम माणिक नोहे।*
*आम्ही आम्हातीत होय।।*

उन्मनावस्थेत आत्मस्वरूपाची जी स्थलकालातीत अनुभूती प्राप्त होते. तिच्यातील धुंदीवरील पदातून व्यक्त झालेली दिसते.

श्रीदत्तभक्तीत भिजलेली श्रीमाणिकप्रभूंची काही पदे खालीलप्रमाणे –

*धाव सखे! गुरुदत्त! माऊली!!!ध्रुवपद!!*
*हंबरोनी तुज पाडस बाहेर। येऊनि पाजवी पान्हाघाऊली।।धाव.।।१।।*
*त्रिविध ताप तापतसे उन्हाळी। येउनि धरी तू कृपेची सावली।।धाव।।२।।*
*माणिक म्हणे प्रभू। येइ तू लौकरी। लागलेंसे मन तुझिया पाऊली।।धाव।।३।।*

**पद –**

करूणाकार दीनवत्सल दत्ता!। सत्वर धावुनि येई रे।। ध्रुवपद।।
तुझे निजरूप पहावे वाटे। म्हणोनि मन अवलोकी दिशा दाही रे।।१।।
भवसिंधुसी पार कराया। तुजविण आणिक नाही रे।।२।।
दास माणिकाची हेचि विनंति। ठेवी मज निजपायी रे।। करुणा।।३।।

**पद –**

*दत्तासी गाईन। दत्तासी पाहीन। वाहीन हें मन। दत्तापायीं ।।ध्रुवपद।।*
*दत्त स्वयंरूप। दत्त मायबाप माझे त्रिविधताप। दत्तवारी।। दत्तासी।।१।।*
*दत्त ज्ञानज्योती। दत्त गुरुमूर्ती। दत्त हरि भ्रांती। माणिकासी।।दत्तासी।।२।।*

**पद –**

*दत्ता! ब्रह्मचारी ब्रह्मचारी। त्रिभुवनांत तुझी फेरी।।ध्रुवपद।।*
*शेषाचलि आसन। माहुरगडांत निद्रास्थान।।दत्त।।१।।*
*काशित स्नान करी।। चंदनलावी पंढरपूरी।।दत्ता।।२।।*
*कोल्हापूर फिरे झोळी। भोजन करी त्रिपुर पांचाली।।दत्ता।।३।।*
*तुळजापूरी धुई हस्त। मेरूशिखरी समाधिस्त।।दत्ता।।४।।*
*माणिक सद्‌गुरूनाथा। जगव्यापक आत्रीसुता।।दत्ता।।५।।*

श्री माणिकप्रभूंनी मार्गशीर्ष शु. ११. स. १७८७ मध्ये हुमणाबाद येथे जिवंत समाधि घेतली.

❖

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ४ थी आणि इयत्ता ७ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता ४ थी, रु. २००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/–
इयत्ता ७वी – रु. ३००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/–

२) इयत्ता १० वी – ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/– ९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/–

३) इयत्ता १२ वी –
आर्टस्/कॉमर्स :
७०% ते ८०%– रु. ७००/–
८०% ते ९०%– रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सायन्स : ८०% ते ९०% – रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/–

४) पदवी – B.A., B.Com. B.Sc.,
सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/–

५) पदव्युत्तर –M. A., M.Com., M.Sc.
प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/–
C.A., L.L.B., Enginear, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/–

६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय)
राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५००/–
याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/– तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम – रु. १००/–
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम – रु. ५००/–
- लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी ही स्कॉलरशिप पुरुस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी ही स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत (कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ). दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

**कार्यवाह :** हेमंत : hemant.a.marathe@gmail.com
**कोषाध्यक्ष :** श्रीनिवास : Shriniwas_marathe@yahoo.com

❖

## भावपूर्ण श्रद्धांजली!

### कै. बाळकृष्ण नारायण मराठे



वेंगुर्ले आम्रतरू कॉम्प्लेक्स येथील रहिवाशी बाळकृष्ण नारायण मराठे (८४) यांचे वृद्धापकाळाने २८ मार्च रोजी निधन झाले. रेडी येथील गोगटे मायनिंग मधून व्यवस्थापक या पदावरून निवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुली : सौ. सुमन, सौ. वसुधा, जावई : सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत रानडे, शंकर तिवेकर, भाऊ : मेघःश्याम, पुतणे : योगींद्र, नरहरी, मकरंद, पुतणी : योगिनी व नातवंडे दिपाली, पूर्वा, हितेश, श्रेयस, श्रुती असा परिवार आहे.

*मराठे परिवारद्वारा*
*कै. बाळकृष्ण नारायण मराठे*
*यांना भावपूर्ण श्रद्धांजली*

# चेहरा

• सौ. साधना सुधाकर मराठे, (पृ. ५७), नागाव अलिबाग भ्रमणध्वनी – ७०६६३६९४३९

लहान मुलांचं मन किती लवचीक आणि संवेदनशील असतं नाही. ह्याचं प्रत्यंतर मला त्या दिवशी तीव्रतेने जाणवलं. घराघरातील छोट्या पडद्यावर इतर कार्यक्रमांबरोबर भरमसाट जाहिरातींचा ही सुळसुळाटच असतो. पण त्या जाहिरातींचा बालमनावर नकळतपणे किती परिणाम होतो. ह्याचा बारकाईने विचार करण्याची वेळ एक दिवस माझ्यावर आली.

माझ्या शेजारीच टि.व्ही. पाहात बसलेली माझी ४ वर्षाची छोटी नात अल्लड वय असलेली स्वराली जाहिरात बघताबघता (तिच्या दृष्टीने काळजीपूर्वक) चटकन म्हणाली. ''ए आजी ह्या टी.व्ही.त दाखवतात ना तशी आई पाहिजे नाही. मी तिच्याकडे क्षणभर पाहातच राहिले. मी तिला जवळ ओढत कुशीत घेत म्हटलं. ''टि.व्ही.तल्या आईसारखी आई पाहिजे म्हणतेस म्हणजे नक्की काय गं'' त्यावर ती पटकन म्हणाली ''ते मला नाही सांगता येत. पण अशी आई पाहिजे.

तिला नक्की काय म्हणायचे ह्याचा मनाशी विचार करता मला प्रकर्षाने जाणवलं तिच्या मनात चाललेली स्वतःच्या आईची व त्या टि.व्ही.तल्या आईची तुलना. रोजच्या पाहाण्यातली तिची स्वतःची आई. शाळा वेळेवर गाठण्यासाठी घरातील कामे भराभरा उरकणारी. तिच्या वाट्याला फार कमी येणारी. सदैव धावपळीत असणारी. आल्यावर थकलेली दमलेली अशी आई तिला नको आहे.

तर तिला हवी आहे सदैव टवटवीत दिसणारी गोड गोड बोलणारी. मायेने जवळ घेणारी. तिच्या प्रत्येक गोष्टीचं कौतुक करणारी, लाघवी हास्य करणारी. शाळेतून घरी येताच आईने पुढे येऊन तिच्या दप्तराचं ओझं आपल्या हातावर घेणारी. दारात उभं राहून वाट पाहाणारी ही तिची माफक अपेक्षा इच्छा पूर्ण करणारी आई तिला हवी आहे. हे तिच्या मनातलं मी ओळखत आहे. परंतु तिला काय ते अजून पूर्णपणे उलगडून सांगता येत नाही. आणि ही तिच्या मनात चाललेली घुसमट नकळतपणे तिच्या ओठातून बाहेर पडली. आणि माझं आजीचं मन आतल्या आत खूप विदीर्ण झालं.

आज ज्या ज्या घरात नोकरी करणारी आई आहे. तिथे हीच मुलांच्या मनातील उदासिनता पाहावयास मिळेल. सर्व्हेक्षण करून मुलांची मने पडताळून पाहिली तर शेकडा ९० टक्के मुलांच्या सुरांतून नाराजीच उमटलेली पाहावयास मिळेल. ज्या घरात आजी आजोबा व इतर माणसे असतील तर त्या मुलांचे बालपण बरेच सुसह्य होते. परंतु जिथे ह्या सुखाचा अभावच आहे व आईबाबा दोघेही कामावर जातात. तिथले दृश्य मात्र मनाला वेदना देणारे असते. ह्या वयात मुलं आक्रमक तरी होतात नाहीतर काही वेळेला संकोची वृत्तीची होतात. स्वतःच्या घराचे कुलूप उघडून आपल्या स्वतःच्याच घरात दार बंद करून एखाद्या कैद्याप्रमाणे राहावं लागतं ह्या सारखं दुर्दैव नाही.

पण हल्लीचा काळ पाहाता मुलांच्या पुढील सुखद भविष्यासाठी त्या आईची चाललेली धडपड जाणवत राहाते. परंतु मन मारून मुलांच्या सहवासाला पारखं होऊन दिवसातले आठ ते दहा तास बाहेर राहावे लागते. त्यावेळेस त्या आईची ही वेदना जीवघेणी असते. परंतु ह्या बदलत चाललेल्या सामाजिक आर्थिक परिस्थितीशी सामना करण्यासाठी ह्या स्त्रीला धडपडावंच लागतं. त्याला ईलाज नसतो. पण माझ्या नातीच्या मुखावाटे निघालेले शब्द मनात कायमच ठाण मांडून राहिले आहेत. मनात विचार येतो त्या छोट्याशा पडद्यावर ताजे टवटवीत प्रसन्न हास्य करत वावरणारी ह्या जाहिरातीतली पण अशीच आपल्या लाडक्या बाळाला काही काळ दूर ठेवून खोटं खोटं हासत दुसऱ्याच्या मुलावर प्रेमाचा उसना वर्षाव करत ती आई सादर होत असते. कारण तिला लाखो लोक पाहात असतात आणि हा खोटा खोटा नाटकी अविर्भाव करत ती पण माझ्या नातीच्या आईसारखीच अर्थाजनासाठी बाहेर पडलेली आहे, का तर मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी.

पडद्यावरची आई आणि वास्तवातली आई ह्या दोन्ही ही एकाच मुशीतल्या आहेत फक्त त्यांचं क्षेत्र वेगळं आहे हे निश्चित. पण हे माझ्या नातीला पूर्णपणे त्या आईतला व स्वतःच्या आईतला फरक कळण्यासाठी काही वर्षाचा कालावधी जावा लागणार आहे. परंतु बालमन किती चटकन एखाद्या दृश्याचा आहारी 'एकरूप होतं' ह्याच मात्र मला राहून राहून आश्चर्य वाटतं.

❖

## सुविचार

**यत्र धर्मसुतो राजा गदापार्णिर्वृकोदरः। कृष्णोऽस्त्री गाण्डिवं चापं सुहृत्कृष्णस्ततो विपत्।। - श्रीमद्भागवत १.९.१५**

अर्थ : जेथे युधिष्ठिरासारखा धार्मिक राजा, गदाधारी भीम, सर्व शस्त्रास्त्रे जाणणारा अर्जुन हातात गांडीव धनुष्य घेऊन सज्ज व श्रीकृष्णासारखा मित्र असा योग आहे तेथेही आपत्ती असावी काय? (अर्थात् दैवगती श्रेष्ठ हेच खरे म्हणावे)

# हे शिक्षण सुखकर होवो

◆ प्रफुल्ल ब. खांबेटे, टिटवाळा भ्रमणध्वनी – ९८१९०९३४१५

निरक्षर निर्मूलनाकरिता शिक्षण प्रसाराची गरज आहे हे निर्विवाद सत्य प्रत्यक्षात उतरवण्याकरिता शिक्षण स्वस्त आणि सुलभ होण्याची नितांत गरज आहे.

लांच देऊन प्रवेश घेतलेला विद्यार्थी पुढे लाच न घेणारा किंवा देणारा नागरिक व्हावा ही अपेक्षा करणंच फोल आहे, उलट तो सवाई लाच घेणारा प्रतिष्ठीत नागरिक होईल.

शाळांतून जागाच रिकाम्या नसतील तर शाळा मुलांना प्रवेश देणार तरी कुठून? वर्गात ६० ते ८० विद्यार्थी असल्यावर कोणताही शिक्षक इतक्या विद्यार्थ्यांवर लक्ष तरी किती ठेवणार आणि शिकवणार तरी कसे? एखाद्या मुलाला स्थानिक शाळेत प्रवेश मिळाला नाही तर शाळेसाठी तो दूर किती जाईल आणि जरी गेला तरी ते त्याच्या बाल्यावस्थेला सुखकर व योग्य होईल काय?

या सगळ्या बिकट परिस्थितीला उत्तर म्हणजे शिक्षण सुलभ आणि खुलं करणे हेच होय. प्रगत तंत्रज्ञानाने शिक्षणाचे अनेक मार्ग आपल्या घरात आणून ठेवले आहेत. ऑन–लाईन /E-learning द्वारे शिक्षण घेणं जास्त सुलभ होऊ शकते. परिक्षा देण्यासाठी शाळेतील प्रवेशाची सक्ती काढून टाकणे हा त्याच्यावरचा उत्तम इलाज होईल. एका विशिष्ट तारखेला पहिली दुसरी व इतर वर्गाच्या परिक्षा होतील असे जाहीर करून त्या शाळेत सरकारकडून (बोर्डाकडून) परिक्षा घेतल्या जाव्यात. ज्यांना शाळेतून प्रवेश घ्यायची आवश्यकता वाटेल त्यांना शाळा मोकळ्या मिळतील. ज्यांचे पालक मुलांना घरी शिकवू शकतात अथवा शिकवण्या लावू शकतात ते त्याप्रमाणे करून विद्यार्थ्याला/पाल्याला सक्षम करून परिक्षेला बसवू शकतील. नुसत्या शाळेनी हल्ली भागत नसून जोडीला क्लासेस जोडावेच लागतात. त्यातून त्या शाळेच्याच अथवा कॉलेजच्या सरांची ट्यूशन लावली तर पास होणे वा मार्क मिळवणे सुलभ जाते. ह्यायोगे वाहन खर्च व इतर धकाधकीच्या त्रासातून पालक व पाल्य मोकळे होतील. शहरातून वाहनांच्यावर पडणारा बोजा, गर्दी, प्रदुषण कमी होऊन व्यवस्थेतील प्रदुषण कमी होऊन Clean Education ची निर्मिती होईल.

ऑफ–लाईन प्रवेश, शैक्षणिक गुंडागिरी, रॅगिंग तसेच शाळा–कॉलेजची रोज पेपरातून येणारी वेगवेगळी गैरप्रकरणे याला पायबंद बसून खऱ्या अर्थानी Clean Education ची सुरुवात व्हावी अशी अपेक्षा करायला हरकत नसावी.

थोडंफार हल्ली कॉलेजचे शिक्षण त्याकडे झुकू लागले आहे. मुले कॉलेजला प्रवेश घेतात व कॉलेजचा उपयोग परिक्षा देण्यापुरता करतात पूर्णवेळ क्लास लावून कॉलेज नावापुरतं राहात. क्लासेस सगळं मॅनेज करतात म्हणजे हळूहळू कॉलेजची जागा क्लास घेत आहे पण हे सगळ काही ठराविक वर्गाकरिता होतंय. हीच व्यवस्था शाळेपर्यंत झिरपली तर शिक्षण मुक्त होऊन घरोघरी क्लासेस निर्माण होतील. सरकार फक्त परिक्षा घेईल शिक्षण प्रत्येकानी आपआपल्या मार्गानी घ्यायचे.

ह्या मुक्त शिक्षणाच्या मार्गाची जाहिरात करून सर्व समाजाला हाच शिक्षणाचा सुखाचा, सोईचा आणि प्रतिष्ठित मार्ग आहे हे समजावणे हे शिक्षणाचा स्तर वाढवायला व शिक्षण सार्वत्रिक व्हायला मार्गदर्शक ठरेल.

दुर्गम व पहाडी भागात जिथे शाळा काढणं सरकारला परवडत नाही. अशा ठिकाणी सुद्धा शिक्षण सोपं होईल. हे मुक्त शिक्षण खर्चाच्या दृष्टिनेही कमी असेल की ज्याने सरकारवर शिक्षणाच्या खर्चाचा बोजा अगदी किरकोळ राहील.

❖

## मानसन्मान

चि. सिद्धार्थ मराठे यांने 'Transform Maharashtra' या स्पर्धेत महाराष्ट्र सरकारचे पहिले परितोषिक मिळविले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा सिद्धार्थचे हार्दिक अभिनंदन

**– प्रेषक श्री. विजय मराठे,** (पुणे)

## तुम्हीही लिहा!

एक प्रसंग, जो प्रत्येकाच्या आयुष्यात घडतो... आनंदी, गोड, कटू... असा, की जो विसरू म्हणता विसरता येत नाही...

तुमच्याही आयुष्यातही असा प्रसंग नक्कीच असेल... जो तुम्हाला इतरांना सांगावासा वाटेल. ही संधी आम्ही तुम्हाला देतोय...

मग, पाहताय काय कागद–पेन घ्या, लिहा आणि पाठवा..

# कोल्हापूरातील मराठे संगीत चिवडा झाला १२५ वर्षांचा

• नंदकुमार मराठे, (पृ. २१७), कोल्हापूर भ्रमणध्वनी : ९९७५४२९४९४

**बा**हेरचं खाणं तर सोडाच; पण हॉटेलात जाणंही वर्ज्य मानलं जात होतं, अशा काळात कोल्हापूरात चक्क महाद्वार रोडवर चिवडा-लाडूचं दुकान सुरू झालं. आज त्याला तब्बल १२४ वर्षे झाली. हे दुकान ज्याला काही लोक कोल्हापुरातलं पहिल्या तीनपैकी एक हॉटेल असेही म्हणतात ते उद्या १२५ व्या वर्षाची वाटचाल सुरू करणार आहे. खवय्यांना दीपावली संपल्यावरही चिवडा-लाडू खायला घालत १२५ वर्षे हे दुकान आहे त्याच ठिकाणी आपला जुना बाज टिकवत उभे आहे. हे दुकान म्हणजे कोल्हापूर शहराचा केंद्रबिंदू असलेल्या महाद्वार रोडच्या सव्वाशे वर्षांच्या सलग वाटचालीचा साक्षीदार ठरले आहे. कोल्हापूरी संगीत चिवडा असं वेगळ्या सुरावटीचंच नाव या दुकानाला आहे.

महाद्वार रोडवर महाद्वार चौकालगतच चिपडे यांच्या इमारतीत हे दुकान आहे. वेंगुर्ला येथील गोविंद विनायक मराठे कोल्हापूरात आले. त्यावेळी महाद्वार रोड आजच्यासारखा मोठा नव्हता. महाद्वार रोडवर दोन्ही बाजूला जोशीराव, चिपडे, कडेकर, नागपूरकर, नारळीकर, सूर्यवंशी, काशीकर, शुक्ला, पंचांगकर्ते लाटकर, वैद्य दुधगांवकर, वैद्य उमराणीकर, नागावकर, मोघे, हसबनीस, दगडू बाळा भोसले, पंडितराव, चावरेकर भोसले यांचे वाडे होते. त्यापैकी चिपडे यांच्या वाड्यात चिवडा-लाडू हे दुकान सुरू झाले. अर्थात त्यावेळच्या स्थितीनुसार ''ब्राह्मणाचे फराळाचे दुकान'' म्हणूनही ते ओळखले जाऊ लागले.

येथे मिळणाऱ्या चिवड्याला संगीत चिवडा का म्हणतात याबद्दल कुतूहल आहे. पण कोल्हापूरातील तत्कालीन नाट्य संगीतातील दिग्गजांचे हे आवडते दुकान व त्यांनी संगीत चिवडा असे त्याचे नामकरण केले व ब्राह्मणाचे हे फराळाचे दुकान कोल्हापूरी संगीत चिवडा म्हणून रूढ झाले.

काजू, मनुके, बेदाणे असलेला येथील चिवडा १२५ वर्षे जशीच्या तशी चव टिकवून आहे. जोडीला बुंदीचे लाडू, डिंकाचे लाडू, नाचणीचे लाडू, गुलकंद बर्फी आहे.

या दुकानाचे वैशिष्ट्य असे की १२५ वर्षे ते एकाच जागी आहे. दुकान म्हणजे महाद्वार रोडच्या स्थित्यंतराचा साक्षीदार आहे. इथल्या शुक्लांच्या वाड्यात कात्यायनीच्या डोंगरातून पाटाने कसे पाणी आणले, हे मराठे यांच्या एका पिढीने पाहिले आहे. महाद्वार रोडवर आज २४ तास वर्दळ आहे; पण शुक्रवार, मंगळवार हा महालक्ष्मी देवीचा वार सोडला तर महाद्वार रोडवर एरवी कायम कशी सामसूम होती, हे या दुकानाने अनुभवले आहे.

पळसाच्या पानाचा द्रोणासारखा वापर डिश म्हणून होत होता. उधारीवर चिवडा, लाडू नेणाऱ्या ग्राहकांनी वेळेत उधारी भागवली नाही तर उधार खरेदीवर ग्राहक म्हणून एक फळा दुकानासमोर लावला जात होता. त्यावर त्या ग्राहकांची नावे लिहिली जात होती. त्यामुळे कोल्हापुरी संगीत चिवड्याची उधारी बुडवण्याची कोणाची हिंमत नव्हती.

आज मराठे यांची चौथी पिढी हे दुकान चालवते. फार जाहिरात नाही, गाजावाजा नाही; पण फक्त जीभेवरील चव या निकषावर संगीत चिवडा, लाडू दुकान सुरू आहे.

गेल्या चार पिढ्या खवय्यांच्या जीभेची चव पुरवणारा ''कोल्हापुरी संगीत चिवडा'' यावर्षी १२५व्या वर्षात पदार्पण करीत आहे. अनेक चढ उतारांना तोंड देत न डगमगता तितक्याच दिमाखात महाद्वार रोडवर ग्राहकांच्या सेवेत रूजू आहे.

१८९२ साली श्री. गोविंद मराठे काहीतरी व्यवसाय करायच्या हेतूने कोल्हापूरात आले. तेव्हा त्यांना श्री. चिपडे सराफांची मदत झाली. ज्या काळात हॉटेलात जाणे अथवा हा व्यवसाय करणे याकडे बघण्याचा दृष्टीकोन नकारात्मक होता. त्याकाळात हा व्यवसाय चालू करून श्री. गोविंदरावांनी मोठे धाडसच केले होते. शुद्ध तुपातील काजू घातलेला चिवडा व खव्याचा कुंदा हे पदार्थ अल्पावधीत इतके लोकप्रिय झाले की त्याची ख्याती देश-विदेशापर्यंत जाऊन पोहोचली. इंग्लंडच्या गव्हर्नर साहेबांचेही एक पत्र आज त्यांच्या दप्तरी आहे. तसेच खव्याच्या कुंद्याच्या टिकाऊपणाबद्दलही 'बावड्याच्या पंत अमात्य' यांचे पत्र आलेले आहे.

मराठेंच्या दुसऱ्या पिढीतील श्री. महादेव मराठे यांनीही ही परंपरा पुढे चालू ठेवली. ते तर संगीत नाटकाचे शौकीन असल्यामुळे जेव्हा कोल्हापूरात संगीत नाटके येत असत त्यावेळी नाट्यक्षेत्रातील मंडळी या दुकानाला हमखास भेट देत असत. आणि इतरांपेक्षा वेगळा तुपातला काजू घातलेला असा चिवडा खाऊन खूष होत असत आणि जाताना गंमतीने तुमचा चिवडा अगदी संगीतच आहे, असे म्हणत असत. हळूहळू या चिवड्याचे 'संगीत चिवडा' हे नामकरणही झाले.

जशा पिढ्या बदलू लागल्या तसे तिसऱ्या पिढीतील श्रीराम मराठे व चौथ्या पिढीतील विनायक मराठे यांनी ही परंपरा तशीच पुढे चालू ठेवून ग्राहकांची बदललेली आवड लक्षात घेऊन

नवनवीन पदार्थ ठेवायला सुरुवात केली. दर्जा व सातत्य यामध्ये कुठेही तडजोड न करता केलेल्या पदार्थांना ग्राहकांनीही प्रचंड प्रतिसाद दिला. आज या चारही पिढ्यातील व्यक्ती हयात नाहीत तरीही मराठे कुटुंबियांनी हा वारसा पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. ❖

# ब्राह्मण समाजासाठी हमोंचे योगदान

**म**राठी साहित्य सृष्टीत आदराने ज्यांचा उल्लेख होतो ते ज्येष्ठ लेखक ह. मो. मराठे. पन्नास व अधिक काळ त्यांचे लेखन मराठी वाचकांना भुलवित आहे. कथा, कादंबरी, वैचारिक लेख, व्यंग अशा अनेक प्रकारात त्यांनी लेखन करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली. पत्रकार, संपादक म्हणूनही त्यांनी आपली छाप पाडली. ह.मो. म्हणूनच त्यांचा अनेक कार्यक्रमात उल्लेख होतो.

जयप्रकाश नारायण यांच्या १९७५-८० या काळातील आंदोलनाने ते भारावले. सप्तक्रांतीची कल्पकायना त्या काळात जनतेसमोर मांडली गेली. त्यातील एक क्रांती जाती विसर्जनाची होती. पत्रकार म्हणून आंदोलनांचा ह.मो. यांनी बारकाईने अभ्यास केला. ते समाजात जाती नसाव्यात व विचारांचा पुरस्कार करीत होते. १९८३-८४ या काळात. किर्लोस्कर या मराठीतील दर्जेदार मासिकाचे ह.मो. संपादक होते. मराठे प्रतिष्ठानच्या पुण्यातील एका सभेला त्यांना बोलावण्यात आले होते. सभेचा विषय होता मराठे कुलवृत्तांताची सुधारीत आवृत्ती काढणे. कुलवृत्तांत ही चित्पावन ब्राह्मण खासियत होती आणि अजून ही आहे. आतापर्यंत शंभराहून जास्त चित्पावन ब्राह्मणांचे कुलवृत्त प्रसिद्ध झाले आहेत. जयप्रकाश यांच्या जातीविरहीत भारताच्या स्वप्नात असलेल्या ह.मो. यांनी कुलवृत्तांत या कल्पनेलाच त्या सभेत विरोध केला होता. तेव्हा ते सभेत बोलताना म्हणाले लोकशाही समाजव्यवस्थेत कुल, जात, या गोष्टींना थारा नाही. सामाजिक न्याय, पुरोगामी यातून ह.मो. म्हणत असत की प्रत्येकाला प्रगतीची संधी जात न पाहाता मिळाली पाहिजे.

या नंतरच्या काळात जय प्रकाशचे पूर्ण होऊ न शकलेले आंदोलन, जयप्रकाशच्या बरोबर लढणारे अनेक पुढारी जातींना कसे घट्ट धरून बसलेले आहेत, फक्त सभेत जाती विसर्जित कराव्यात ते बोलत व निवडणुका आल्या की जात, धर्म याची गणिते कशी मांडली जातात याची नोंद ह.मो.चे मन घेत होते. त्यातच जातींवर आधारीत आरक्षण व्यवस्था राजकारणाच्या फायद्यासाठी सुरू इ. त्यांनी पहिली. जातीभेद नष्ट होण्या ऐवजी जातीभेद वाढत चालल्याचे त्यांनी निरीक्षण केले व यात प्रामुख्याने ब्राह्मणांवर नको तितके टीकेचे आसूड ओढल्याचे त्यांनी पाहिले. ह.मो. यांचे विचार बदलत गेले मराठे प्रतिष्ठानच्या सभांना जाऊ लागले. ब्राह्मण संस्थानच्या सभेतही आमंत्रण आले तर जाऊ लागले. या सभांत ब्राह्मणांवर होत असलेल्या नाहक टीकेला ते उत्तर देऊ लागले.

पत्रकार व संपादक या नात्याने त्यांचा अनेक लोकांशी जसा घनिष्ठ संबंध आला तसाच समाज प्रश्नांची जाणीवही त्यांना झाली व त्या जाणिवेतून त्यांचे वैचारिक लेख लिहिले गेले व ते लेख लोकमान्यही झाले. या समाज निरीक्षणातूनच त्यांनी ब्राम्हण समाजावर हकनाहक होणारी विद्वेषी टीका पाहिली, अनुभवली व त्यातूनच त्यांनी २००४ साली किस्रीमच्या दिवाळी अंकात ''ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार'' हा प्रदीर्घ लेख लिहिला. या लेखाने साहित्य क्षेत्रात प्रचंड खळबळ झाली. हा लेख वाचणारे सर्व जातींचे वाचक होते. या लेखावर अनेक प्रतिक्रिया त्यांच्या किस्रीमकडे आल्या, ज्यात समाजातील सर्व जातीचे वाचक होते. या प्रतिक्रियांचे ब्राह्मण मान नावाचे २२५ पानांचे एक पुस्तक ही प्रसिद्ध झाले आहे.

ब्राह्मणांनी समाजासाठी केलेले योगदान, शिक्षणप्रसार, समाजसुधारणा, धर्मसुधारणा, अस्पृश्य स्त्रीशिक्षण या सारख्या अनेक गोष्टींना समाजात श्रेय मिळत नसल्याची खंत त्यांच्या लेखनात झाली. जातीजातीत वैमनस्यं नसावे, सर्वांनी सामंजस्याने राहावे यासाठी त्यांच्या पुढाकाराने विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच या विश्वस्थ संस्थेची स्थापना झाली. या मंचाने पुस्तकांची किंमत खूपच कमी ठेवली. पुस्तिकांना प्रतिसाद मिळाला. पण कमी किमतीमुळे या पुस्तिकेची विक्री होऊनही तोटा सहन करावा लागतो आहे. या साठी या मंचला ट्रस्टला देणग्या द्यावी असे आवाहन ह.मो. यांनी केले आहे. ट्रस्टच्या नावानेच चेक काढावा अशी विनंती त्यांनी केली आहे. अधिक माहितीसाठी देणगीदारांनी ९४२३०१३८९२ या मोबाईलवर संपर्क करावा. श्री. ह.मो. मराठे यांच्या या उपक्रमास आपल्या कुलबांधवांनी शक्यतितका हातभार लावावा व ब्राह्मणांची बाजू ठामपणे मांडण्याच्या या भूमिकेस आपला पाठिंबा दर्शवावा ही विनंती. ब्राह्मणांवर होणाऱ्या नाहक टीकेला ह.मो. जरी उत्तर देत असले तरी माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येकाचे मूल्य समानच आहे. ब्राह्मणांनी पण मानवी समतेची संकल्पना स्वीकारली पाहिजे.. हे सूत्र ते आपल्या भाषणातून ठासून मांडतात. लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, महर्षी कर्वे यांनी समानतेची भूमिका मांडली होती याची जाणीवही ते आपल्या भाषणातून देतात. थोर व्यक्ती ब्राह्मण होत्या पण त्यांनी स्वजातीचाच फक्त विचार न करता समाज सुधारणेचे काम समाज अधिकाधिक सुशिक्षित होत आहे. ब्राह्मणांवर नाहक टीका न करता मानवी धर्म सर्वांनी आचरावे असे ह.मो. मराठे ठासून सांगतात. मराठे कुलातील सर्वजण त्यांच्याशी सहमत असतीलच. ❖

# ब्रॉन्कीयल अस्थमा (दमा) (Bronchial Asthma)

• डॉ. सीमा श्याम मराठे, (पृ. ४११) भ्रमणध्वनी – ७५०७९१२९०६

दमा दोन प्रकारचा असतो. एक कार्डियाक अस्थमा, जो हृदय रोगांमुळे उद्‌भवतो व दुसरा ब्रॉन्कीयल जो श्वसनसंस्थेत बिघाड झाल्यामुळे होतो. आपण याचाच विचार करणार आहोत.

कारणे १) आनुवंशिकता – आनुवंशिक कारण असेल तर बालपणीच किंवा वयाच्या पंधरा वर्षाच्या वयापर्यंत दमा होतो.

तसं पाहिलं तर अस्थमा कोणत्याही वयात होऊ शकतो. उशीरा म्हणजे वीस वर्षाच्या वयानंतर सुरू झाल्यास त्याची कारणे वेगवेगळी असतात.

२) ॲलर्जी – शरीराला सहन न होणाऱ्या पदार्थांशी संपर्क आल्यास त्याचे दुष्परिणाम लगेचच दिसून येतात. यालाच ॲलर्जी असे म्हणतात. प्रत्येक व्यक्तींमध्ये ॲलर्जीचे घटक वेगवेगळे असू शकतात. प्रामुख्याने हवेतील प्रदूषण कारणीभूत ठरते.

धूर, धूळ, कारखान्यांतून बाहेर पडणारे वायू, फुलांचे सुगंध, गवत, प्राण्यांचे केस व पिसे, तसेच प्राण्यांचे मलमुत्र, टालकम पावडर किंवा इतर पदार्थांच्या पावडरी, यांमधील कोणत्याही पदार्थांची ॲलर्जी असू शकते. खाण्याच्या पदार्थांची ॲलर्जी सहज लक्षात येते. अंडी, दूध, काही प्रथिने, गहू, चॉकलेट, घेवडा, बटाटे, प्राण्यांचे मांस, मासे, विशिष्ट फळे वगैरे. औषधेही बऱ्याच प्रमाणात कारणीभूत असतात. विशेषतः ठरावीक ॲन्टिबायोटिक्स, टॉनिक्स इत्यादि.

स्वतःला कोणत्या पदार्थांची ॲलर्जी आहे हे काही वर्षांच्या अनुभवांवरून कळून येते. वैद्यकीय पद्धतीनेही रक्त तपासणी वा त्वचेवरील रिॲक्शन्सवरून कोणत्या प्रकारची ॲलर्जी आहे हे समजते.

३) हवेमधील बदल – अचानक हवेमधील बदलामुळे दम्याचा त्रास सुरू होतो. थंड, दमट, पावसाळी हवा, धुकं असलेली हिवाळी हवा, अधूनमधून केव्हाही पडणारा पाऊस असे हवेतील बदल दमा असलेल्या व्यक्तीस सहन होत नाही व दम्याचा ॲटॅक येतो. श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो.

४) राहाण्याचे ठिकाण – समुद्र किनारी राहात असल्यास तेथील वातावरण सेन्सीटीव्ह व्यक्तींना सहन होत नाही. त्याचप्रमाणे डोंगराळ भाग वा अती उंचीवरील ठिकाणी निवास केल्यासही ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे दम्याचा त्रास होऊ लागतो. अति थंड बर्फाळ प्रदेश श्वसनसंस्थेला बाधक ठरतो. त्यामुळे समशीतोष्ण हवामान असणे अस्थमाच्या व्यक्तींना सोयीचे असते.

५) शरिराला न झेपणारे अधिक श्रम, अवेळी जेवण– त्यामुळे होणारे पचनाचे विकार, कमी झोप, पचण्यास जड व अधिक मात्रेमुळे अन्नग्रहण (यामुळे डायफ्रॅमवर दाब येतो), अधिक बोलणे, ओरडणे किंवा जोराने हसणे ह्यामुळेही दम्याचा ॲटॅक येऊ शकतो.

६) व्यक्तीचा स्वभाव – ब्रॉन्कियल अस्थमा असलेल्या व्यक्ती सर्वसाधारणपणे अधिक भावनाप्रधान असतात. काळजी करण्याची सवय, त्वरीत राग येणे, नैराश्य येणे हे मानसिक असंतुलनामुळे घडते. अशा भावना बळावल्यास दम्याचा ॲटॅक येऊ शकतो.

या शिवाय दम्याच्या व्यक्तींची जनरल प्रकृतीही नाजूक असते. कष्ट सहन होत नाहीत. त्वचाही नाजूक असल्यामुळे त्वचा लाल होणे, खाज येणे, पित्त उठणे वगैरे दिसून येते.

७) वारंवार होणारे श्वसनसंस्थेमधील अवयवांवर जंतूंचा संसर्ग यामुळे अर्थात श्वसनसंस्था (Respiratory Systeme) संवेदनशील होते.

दमा होण्याची कारणे आपण पाहिली. या दिलेल्या कोणत्याही कारणांमुळे दम्याचा ॲटॅक येतो. सहसा तो ताबडतोब येतो (Suddenly) नाकाच्या आतील भाग सुजतो. व सुरुवातीला सर्दी आल्याप्रमाणे शिंका येतात. (दर वेळेला येतीलच असे नाही) श्वासनलिका, ब्रॉन्काय यांच्या आतील भाग सुजल्यामुळे हवा जाण्याचा मार्ग आकुंचन पावतो. प्रथम छातीवर दबाव आल्यासारखे वाटते. घट्टपणा जाणवतो. श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. विशेषतः ऊच्छ्‌वास अधिक त्रासदायक असतो. श्वास आत घेतांना हवा कमी घेतली जाते. एकंदरीतच श्वसनाची संपूर्ण क्रिया कष्टसाध्य होते. छातीच्या फासळ्या व त्यामधील मसल्सवर ताण पडू लागतो. श्वसनाचा वेग वाढतो. संपूर्ण छातीचा भाग खांद्यांच्या मदतीने जास्तीत जास्त हवा आत घेण्याकरिता प्रयत्न करतो आणि त्याकरिता विशिष्ट पोझिशन घ्यावी लागते. बसूनच राहावे लागते. पेशंटला झोपणे – आडवे होता येत नाही. उच्छ्‌वासाच्या वेळी विशिष्ट आवाज येतो. याला wheezing साऊंड म्हणतात. सुरुवातीला खोकला कोरडाच असतो. बोलण्याच्या क्रियेत सहसा फरक पडत नाही. परंतु ॲटॅक आल्यानंतर पेशंट कमी बोलतो. हृदयाचे ठोके वाढतात. पल्स रेट वाढतो. ऑक्सिजन कमी पडल्यामुळे त्वचा फिकट दिसते.

अस्थमाचा अशा प्रकारचा ॲटॅक बऱ्याच वेळा जसा

अचानक येतो तसाच अचानक जातो. श्वास घेण्याची क्रिया सुधारते. काही वेळा मात्र दम्याचा त्रास फार वेळ टिकतो. पेशंट अस्वस्थ होतो. ऑक्सिजन कमी पडल्यामुळे त्वचेवर, नखांवर फिकट निळसर रंग येतो. (cymosis) पेशंट बोलत नाही परंतु शुद्धीवर असतो. अशा अवस्थेत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे. ऑक्सिजन थेरपी इतर औषधांबरोबर दिली जाते. पेशंट लवकरच सुधारतो. व्यक्ती पूर्णपणे नॉर्मल होते. श्वसनाच्या त्रासातून गेली आहे हे कळतही नाही. आपले दैनंदिन व्यवहार, नौकरी चांगल्याप्रकारे करते.

हा दमा लहान वयात सुरू झाल्यास काही वर्षानंतर पूर्णपणे बरा होतो. उशीरा सुरू झालेला दमा आयुष्यभर राहातो. सहसा आयुष्य पूर्णपणे जगतो. मात्र इतर आजार असल्यास – उदा. हृदयविकार, ॲनिमिया, डायबेटीस, श्वसनसंस्थेचे सातत्याने होणारे इन्फेक्शन यामुळे अधिक शारीरिक बाधा होवून आयुष्यमान घटते.

निदान – वर सांगितलेल्या लक्षणांवरून अस्थमाचे निदान डॉक्टर सहजपणे करतात.

रेडिऑलॉजिकल (X-Ray) – साध्या ब्रॉन्कियल अस्थामाच्या रोग्याचे X-Ray नॉर्मल असतात. श्वसन संस्थेत कोणतेही बिघाड दिसून येत नाहीत.

फार वर्षे सातत्याने दम्याचा त्रास, जोडीला इतर रोगांचा प्रादुर्भाव असल्यास फुफ्फुसांमध्ये बिघाड दिसून येतो. श्वसनसंस्थेच्या अवयवांमध्ये बदल झालेला दिसतो.

रक्तचाचणी – रक्तामधील इओसिनोफिल्स या पेशी वाढलेल्या दिसून येतात. शारीरिक प्रकृती तशी नॉर्मल असल्यास रक्तामध्ये बाकी इतर दोष आढळून येत नाहीत.

उपचार (ट्रिटमेंट) – १) पेशंटला सोयीच्या पोझिशनमध्ये बसवणे, २) ब्रॉन्को डायलेटर औषधे (डॉक्टरांच्या सल्ल्याने नेहमी जवळ ठेवावी), ३) नेब्युलाझेशन (Aerosol treatment)– नाकावाटे डॉक्टरांनी दिलेल्या औषधांची वाफ घेणे, किंवा स्प्रे वापरणे, गंभीर केसेसमध्ये – इंजेक्शन दिले जाते, ४) ऑक्सिजन थेरपी – तीव्र तऱ्हेचा ॲटॅक आल्यास सध्या दम्याच्या पेशंटस्‌ना सवय होते व नेहेमीची औषधे स्प्रे वगैरे ते जवळ ठेवतात. थोड्याच वेळात नॉर्मल श्वास घेऊ लागतात, ५) ॲलर्जीचे निदान लवकरात लवकर करावे. दम्याचा त्रास टाळता येईल.

❖

# बंदी रामचंद्र शेलार

• अच्युत म.चक्रदेव, (पृ. ७५३), पुणे

**सा**धारण सन १९८३ ची ही हकीगत आहे.

मी त्यावेळी नाशिक वर्ग मध्यवर्ती कारागृहांत कार्यरत होतो. माझ्या कार्यालयात त्यावेळी बंदी रामचंद्र शेलार हा काम करीत होता. एके दिवशी दुपारी बोलता बोलता तो मला म्हणाला की, ''साहेब मला पाटी पेन्सिल पाहिजे आहे. कारागृहाच्या शाळेतून ती मला मिळण्याची तुम्ही व्यवस्था करा.'' साक्षरता प्रसाराचे माध्यमांतून मी ताबडतोब आमचेकडील शिक्षक श्री. गायकवाड गुरुजींना बोलावून घेतले व रामचंद्रला पाटी दिली व गुरुजींना सांगितले की, ''गुरुजी आजपासून रामचंद्र हा तुमचा विद्यार्थी आहे, त्याचे शिक्षणाची व्यवस्था करा.'' त्यांनी त्वरीत व्यवस्था केली. रामचंद्रचे वयाच्या तिसाव्या वर्षी शिक्षणाचा श्रीगणेशा अर्थात 'ग, म, भ, न' सुरू झाले. रामचंद्र मनापासून अभ्यास करू लागला. लिहू, वाचू लागला. पुढे त्याने अभ्यासात चांगलीच प्रगती केली. तो सातवी इयत्ता उत्तीर्ण झाला. महापालिकेचे शिक्षणाधिकारी त्याची परीक्षा घेण्यासाठी मुद्दाम आले होते. मी रामचंद्रला शाबासकी दिली व पुढे काय करणार आहेस असे विचारले तेव्हा तो म्हणाला, ''साहेब, माझेप्रमाणे जे बंदी निरक्षर आहेत. त्यांना मी शिकवण्याकरीता श्री गायकवाड गुरुजींना मदत करणार आहे, आणि मी ही पुढे एस.एस.सी पर्यंत शिकणार आहे व आपल्या प्रयत्नाने आपण जो कारागृहात संगणक प्रशिक्षण वर्ग सुरू केला आहे, संगणक प्रशिक्षण घेण्याचीही माझी इच्छा आहे मी त्याला म्हणालो, ''अरे हे सगळे तुझ्या मनात कसे आले?

त्याने अुत्तर दिले की, सुरुवातीला मला अक्षर ओळख नाही हे समजताच आपण मला चांगलेच फैलावर घेतले होते. आपण म्हणालात अरे कमीत कमी तुला घरून आलेले पत्र वाचता आले पाहिजे व घरी पत्र पाठवता आले पाहिजे.'' एवढे तरी नक्की कर ''याचा माझे मनावर चांगलाच परिणाम झाला आणि त्याच दिवशी मी तुमच्याकडे पाटी पेन्सिलीची मागणी केली. शिक्षणाचा तसेच संगणक प्रशिक्षणाचा काय अुपयोग होतो, हे मला आता चांगलेच समजले आहे. मी आता नियमाने वर्तमानपत्र वाचतो व बाहेरचे जगात काय चालले आहे हे मला चांगलेच कळू लागलेले आहे आणि म्हणूनच मी इतर बंदीनाही शिक्षणासाठी मदत करणार आहे. त्याशिवाय कारागृह मातेचे ऋण मला फेडता येणार नाही.''

मी मनात म्हटले वा, छान, गंगेचे पाणी गंगेलाच अर्घ्य म्हणून द्यावे असाच प्रकार आहे हा.

❖

# ढग फुटीच्या पूरातून बचावलो

• विठ्ठल महादेव मराठे (पृ. २३५),सांगली  भ्रमणध्वनी – ९४२०६७८९६५

सिव्हील इंजिनियरिंगसाठी डिप्लोमा परीक्षा पास झाल्यावर जुलै १९५७ मध्ये अहमदनगरच्या मुळा डॅम डीव्हीजनमध्ये ओव्हरसियर म्हणून रूजू झालो. राहुरी जवळ वंजारवाडी येथे मुळा नदीवर दगडी धरण मंजूर झाले होते व त्यासाठी नगर येथे हा धरण विभाग उघडला होता. आता आपल्याला धरणावर सुपरव्हिजन करण्यास मिळणार या रुबाबात असताना नवीन नेमणूक झालेले आम्ही सर्वजण वंजारवाडी येथे दगडी धरण बांधण्याचे काम स्थगित करण्यात आले. स्थळ पक्के व्हावे, लग्नाची तयारी व्हावी आणि अचानक मध्ये विघ्न यावे तशी परिस्थिति निर्माण झाली. कारण वरीष्ठ मुख्य अभियंता यांनी वंजारवाडी ऐवजी अन्य साईटचा सर्व्हे करण्याचे आदेश दिले होते. वंजारवाडीच्या नशीबात धरण होणे नव्हते व आमच्या नशीबात तेथे सुपरव्हिजन करण्याचे नव्हते! त्या आदेशाचे पालन करीत १९५७ पासून १९५९ पर्यंत आम्ही राहुरी पासून पार वर अगदी पुणे नाशिक रस्त्यावरील घारगावपर्यंत मुळा नदीवर अनेक साईटचा सर्व्हे केला. शेवटी राहूरी जवळ बारगाव नांदूर येथे मातीचे धरण मंजूर झाले (सध्या तेथेच धरण आहे)

बारगाव नांदूर येथे धरण मंजूर झाले. कामास सुरुवात झाली. तेथे पायात अनंत अडचणी आल्या त्या सर्वांवर मात करीत धरणाचे काम प्रगतीपथावर होते. आता नदी पात्रातील काम करायचे होते. नदी पात्रात काम करता यावे यासाठी नदीतील उन्हाळ्यातील पाण्याचा किरकोळ प्रवाह नदीच्या डाव्या बाजूच्या खिंडीतून काढलेल्या कॅनाल मधून वळविण्यासाठी नदीमध्ये मातीचा लहान बंधारा (Coffer Dam) बांधला होता.


सर्व काम व्यवस्थित चालू होते व आणखी आठ पंधरा दिवसात पूर्ण झाले असते. आमच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसह आम्ही सर्वजण अहोरात्र काम करीत होतो. १६ मे रोजी हलका पाऊस झाला. आमची थोडी पळापळ झाली कारण कामात व्यत्यय येऊन उपयोग नव्हता. आणि नंतर तो २० मे १९६१ चा दिवस उजाडला. नदीच्या वरील भागात कोठेतरी थोडा पाऊस झाला होता व त्या मुळे नदी पात्रातील बंधाऱ्यामागील पाणी वाढू लागले होते. पाण्याची पातळी इतक्या गतीने वाढू लागली की आता बंधारा फुटतो की काय या धास्तीने त्यावर वाळूची पोती रचण्यात आली. मी व माझे दुसरे सहकारी अभियंता व्ही.ओम.जोशी नदीच्या डाव्या तीरावरील कॅनालची पाहाणी करण्यास गेलो होतो ते हातातील बॅटऱ्यांच्या उजेडात रात्री ९ च्या सुमारास नदी पात्रातून उजव्या तीरावर आलो. बंधाऱ्याची स्थिती काय आहे याची इतर सहकाऱ्यांजवळ चौकशी करत असतानाच बंधाऱ्यावरून पाणी वाहू लागले व बंधारा फुटला. आम्हाला येण्यास थोडा जरी उशीर झाला असता तर आम्ही दोघे वाहून गेलो असतो. जोशांचा विवाह झाला होता. माझा विवाह ठरला होता तो २२ जून १९६१ रोजी होणार होता. सदर दिवसाची आठवण आज आली तर..

पण दैवी कृपेने सर्व ठीक झाले होते. आम्ही दोघे त्या संकटातून वाचलो. ठरल्याप्रमाणे माझा विवाह २२ जून १९६१ रोजी झाला. आमचे त्या वेळचे कार्यकारी अभियंता (कै) के. आर. दाते यांनी त्या दिवशी जागोजागी पडलेल्या पावसाचा अभ्यास करून जो पूर बंधारा फुटण्यास कारणीभूत झाला तो ढग फुटीमुळे आला होता असे सिद्ध केले.

(हे के. आर. दाते (१९२६–२००८) नंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर तज्ञ म्हणून गणले गेले. पानशेत धरण फुटल्यावर मा. नाईक कमिशन. पुढे त्यांनी सरकारची बाजू मांडली.)

❖

## सहवेदना



एक वाईट बातमी की उत्कर्ष शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ आजीव सदस्य श्री. राजारामभाऊ ऊर्फ अण्णा मराठे यांचे हृदयविकाराचा झटका येऊन १ मे ला दुपारी ३च्या सुमारास निधन झाले.

ती. अण्णांनी आपले उत्कर्ष मंदिर कनिष्ठ महाविद्यालय चालू होणार हे कळताच एक Prospectus चा नमुना स्वतः तयार करून पाठवला होता.

ती. अण्णांचा मुलगा श्री. अनिल मराठे व नातू कु. जयंत मराठे हे उत्कर्ष मंदिरचेच माजी विद्यार्थी आहेत. .

ती. अण्णा अर्थातच मराठे प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य व वडीलधारी होते.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. राजाभाऊ तथा अण्णा मराठे यांना विनम्र श्रद्धांजली.

***ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.***

# आठवणीतून कधीच न गेलेले गाव

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, (पृ. १२०) दूरध्वनी -०२२- २४१५०८८९

आपण आईच्या कुशीत जन्मतो. वाढतो. माझ्या बालपणी ज्या गावाच्या मांडीवर मी मनसोक्त लोळले, ज्याच्या खांद्यावर निर्भयपणे हुंदडले, ज्या गावाने मला कडेवर घेतले ते मुरबाड गाव 'आठवणीतील गाव' कसे होईल बरे? जन्मदात्या आईला कोणी विसरते का? सुदैवाने मी ही एवढी अभागी, करंटी नाही की मी माझ्या गावाला विसरेन आणि आठवणीत जमा करून टाकीन! माझ्या गावाची स्मृती सदासर्वकाळ माझ्या मनात रुंजी घालते. लहान शिशु जसे आईच्या अवतीभोवती सदैव घोटाळत असते ना किंवा कोंबडीची पिल्ले अशी कोंबडीच्या मागेमागे फिरत असतात ना, तशा माझ्या गावाच्या स्मृति मनात मागे मागे येत असतात. रोजच्या घाईगर्दीच्या व्यवहारात, गर्क असताना, माझ्या मुलाबाळात दंग असताना, पतीच्या प्रेमात न्हालेली असतानाही माझ्या गावाची आठवण झाली नाही असा दिवस जात नाही. माझ्या गावाची आठवण सदैव ताजी, टवटवीत आहे, मरगळलेली नाही. त्याला कारणही तसेच आहे. मला माझ्या गावाने भरभरून खूप काही दिले आहे. अमोल ठेवा आहे तो!

मला आठवतोय लहानपणीचा प्रसंग. पहिलीत असेन मी तेव्हा. साधारण ६१-६२ सालातली गोष्ट. शाळा खूप लांब होती आणि मी प्रकृतीने किरकोळ होते तेव्हा ऊन्ह लागू नये म्हणून मला वडील डोक्यावर 'हॅट' घालून शाळेला पाठवीत. शाळेत हॅट घालून जाणाऱ्या मुरबाडात मुलीच नव्हत्या. वर्गातल्या, शाळेतल्या मुलींना हॅटविषयी फार कुतूहल असायचे, आकर्षण वाटायचे. मी एकटीच साहबिणीसारखी रूबाबात हॅट घालून जायचे याबद्दल शाळेतल्या काही मुली माझा उपहास करीत, चेष्टामस्करी करीत. तेव्हा वडिलांना मी सांगितले डोक्यावर हॅट घालून जाणार नाही. मुली चिडवितात. त्यावर वडील म्हणाले, माझे नाव सांग म्हणजे गप्प होतील. त्याप्रमाणे मी मुलीना मोठ्या ठसक्यात ऐटीत सुनाविले, ''माझे वडील किती किती शिकलेत, मॅट्रिक आहेत ते आणि मोठ्या इंग्रजी शाळेचे हेडमास्तर!'' (खरे म्हणजे वडील बी.ए. बी.टी होते हे फार उशिरा समजले) मात्रा लागू पडली.

मुरबाड गावात एक ''जय भारत टॉकीज'' नावाचे सिनेमाथिएटर होते. कुडाचे थिएटर, भिंती शेणाने सारकलेल्या, पण खूप मोठे होते. फक्त रात्रीचा शो असायचा - सांगताना ९ वा. सिनेमा असला तरी वेळेवर ९ला कधीच सुरू व्हायचा नाही. कधी एकदा सिनेमा सुरू होतोय इकडे सर्व लक्ष लागलेले असायचे. नजरा त्या पडद्यावर खिळलेल्या असायच्या. तेव्हा त्या पडद्यावर नाच करीत असलेली एक पाल दिसायची. तिची सावलीही दिसायची. क्वचित पालींचे सामूहिक नृत्यही पडद्यावर दिसायचे. आईला कंटाळून विचारले की सिनेमा कधी सुरू होणार, की ती जोरात अंगावर खेकसायची, कंटाळा आला असला तर घरी जा आणि झोपा पण सिनेमा पाहाण्याच्या अनावर ओढीने आम्ही भावंडे तशी ताटकळत, डोळे चोळीत बसत असू. या वाट पाहायला लावणाऱ्या कठीण समयात थंड लग रही है मुझसे दूर तू न जा हे मोठ्या आवाजातले फिल्मीगीत तेवढे आमची सोबत करायचं. सिनेमा अकरा-बारा वाजेपर्यंत कसाबसा सुरू व्हायचा.

त्याक्षणी एवढा म्हणून आनंद व्हायचा की प्रत्यक्ष देव भेटल्यावर भक्तालासुद्धा इतका आनंद झाला नसेल! सिनेमा चालू असताना अनेकदा फिल्म तुटायची, लाईट जायचे या सर्व व्यत्ययातून सिनेमा संपायला रात्रीचे २-३ वाजायचे. सिनेमा चालू असताना पायाखालून मोठे मोठे १-१ किलो वजनाचे उंदीरही जायचे. विदाऊट तिकीट हे उंदीर थिएटरात वावरायचे. उंदरांच्या भीतीमुळे मी नेहमी थिएटरात खुर्चीवर पाय वर घेऊन बसायची. पाय अवघडले आणि खुर्चीखाली सोडले की सिनेमावरचे लक्ष उडून मामांकडे (उंदीर) लागायचे. सापांचीही भीती असायची.

आज त्या मजेशीर प्रसंगांकडे पाहाताना वाटते, सहनशक्तीची सीमा ओलांडेपर्यंत आम्ही सिनेमाची वाट पाहायचो, अधिरी मन ताब्यात ठेवायचो, बालपणी नकळत एक चांगला संस्कार मनावर कोरला गेला. उतावीळी, घाई, अधिरेपणा कामाचा नाही, थांबायला शिका, संयम ठेवा, मनाचा तोल ढळू देऊ नका - शहरात असती तर हा अनुभव मला ना येतो आणि जबरदस्त सहनशक्तीची ताकद, धीर धरणे इ. गुण अंगात ना बळावते! या गुणांचा आजही व पुढील आयुष्यात फायदाच होईल.

माझ्या या मुरबाड गावात मी निर्भयपणे बागडले. ही निर्भयता मला माझ्या वडिलांकडून (वै. के. वा. भातखंडे, न्यू इंग्लिश स्कूलचे संस्थापक व मुख्याध्यापक, शिक्षणाची ज्ञानाची पवित्र गंगा ज्यांनी गावात आणली. मुरबाडच्या संस्कृतीत,

जडणघडणीत ज्यांचा मोलाचा वाटा आहे) लाभली होती. या गुणाच्या जोरावर पहाटे ४ वाजता ऐन कडाक्याच्या थंडीत अंधारातून मी एकटी घरापासून लांब असलेल्या एस.टी. स्टॅन्डवर जायची. कल्याणला बिर्ला कॉलेजात जाण्यासाठी पहिली बस मला पकडावी लागायची पण रस्त्यातून चालताना मला माणसाची, चोरांची, गुंडाची भीती कधी वाटली नाही, भीती वाटायची ती कधीही न पाहिलेल्या भुतांविषयी, पिशाच्चविषयी – गावाचे उबदार, सुरक्षित कवचबरोबर असायचे.

आज गावाचे रूप पालटले आहे. सर्व खेड्यांचे झपाट्याने शहरीकरण होत आहे, औद्योगिकीरण होत आहे.

वडील गेल्यावर व आई निवृत्त झाल्यावर साहजिकच मुरबाडला जाणे कमी झाले. मुरबाड आता दुरावत जाणार अशी भीती वाटत असताना पुन्हा आशेचा किरण दिसला. माझा भाऊ मुरबाडला मोठे तारांकित हॉटेल बांधतो आहे. तेव्हा या ना त्या निमित्ताने मुरबाडला जाणे होईल. गावाशी असलेला ऋणानुबंध जोडलेला राहील. गावाशी असलेला प्रेमाचा धागा पक्का होईल.

वर्षातून एक-दोनदा तरी गावाला भेट देणे होईल. त्यानिमित्ताने माझ्या भावस्मृतींना उजाळा मिळेल, पुन्हा एकदा तो काळ सजीव होऊन मी तो काळ जगेन! त्यामुळे जीवनातील काही क्षण आनंदाचे, चैतन्याचे जातील आणि पुढील आयुष्याची वाट चालायला जोर येईल! कवीवर्य ग. ल. ठोकळ यांची कविता ओठावर येते. ती अशी, 'तिथे न जाई मोटर गाडी, तिथे न गेले रूळ कशीबशी बैलांची गाडी धडकन घेई ठाव. कसेही असले गाव तरी ते माझे मजला प्यार स्मरण तयाचे होता उठती हृदयी कोमल भाव.

❖

# चकित करणारा अवचित गड

• **श्री. निरंजन प्रभाकर मराठे,** (पृ. १२०)



**अ**वचितगड रोहे तालुक्यातील एक छोटेखानी किल्ला. रोह्यास मावशीचे घर असल्यामुळे दरवर्षी मे महिन्याच्या सुट्टीत जाणे-येणे असे. किल्ल्याचे नावदेखील कानावर पडत असे. पण किल्ल्यावर जाणे काही जमले नाही. हा योग जुळून आला तब्बल २०-२५ वर्षांनंतर Rock Climbers Club मुंबई!!!

मुंबईपासून रोहे शहर हे तीन-चार तासाच्या अंतरावर आहे. नागोठणेमार्गे भिसे खिंडीतून खाली आल्यावर मेढा हे गाव लागते. त्या गावातून किल्ल्यावर जाण्यास वाट आहे. ह्या व्यतिरिक्त पिगालसाई आणि पेंडसे या गावातूनदेखील वाटा आहेत. अशा ह्या अवचितगडावर जायची तारीख ठरली ३ सप्टेंबर २०१२. Rock Climbers Club बरोबर मी प्रितम हॉटेल, दादर येथून पूर्ण तयारीनिशी आम्ही अवचितगडाकडे कूच केले. मेढा गावात पोहोचेपर्यंत सूर्य डोक्यावर आला होता. आम्ही तशाच परिस्थितीमध्ये किल्ल्यावर चढाईस सुरुवात केली. मेढा गाव संपल्यावर दोन विहिरी लागतात. विहिरीतील पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब छान चमकत होते. पावसाचे दूरपर्यंत नाव नव्हते. त्यामुळे विहिरीतील पाण्याचे दर्शन घेऊन दुधाची तहान ताकावर भागवली. किल्ल्याकडे जाणारी वाट ही गर्द झाडीतली असल्यामुळे उन्हाचा त्रास तितकासा होत नव्हता.

साधारणतः दोन तासात आम्ही किल्ल्यावर प्रवेश केला. किल्ला तसा लहान असल्यामुळे पूर्ण किल्ला पादाक्रांत करण्यास दीड तास पुरेसा होतो. किल्ल्यावर बघण्यासारखी महत्त्वाची ठिकाणे म्हणजे पनवेलच्या दुर्गमित्रांनी १५० फूट दरीतून वर काढलेली तोफ, पिंगलसाई देवीची घुमटी, महादेवाचे आणि म्हसोबाचे मंदिर, युद्धशिल्प, छोटासा तलाव, ह्या व्यतिरिक्त पेंडसे गावाकडे जाणारा साकव (लाकडी पूल) आपले लक्ष वेधून घेतो. वातावरण जर उत्तम असेल तर सुधागड, सरसगड, तैल बैल, कोरीगड, घनगड आणि दुर्गराज रायगडच्या दर्शनाचा लाभ आपण घेऊ शकतो. रोहे शहर आणि कोकण रेल्वे यांचे विलोभनीय दृश्य किल्ले अवचितगडावरून दिसते. अवचितगडाची इतिहासात तशी नोंद घेतलेली दिसत नाही. ह्या किल्ल्याची शिलाहार राजवटीत जडणघडण झाली असे इतिहासतज्ज्ञ मानतात. किल्ल्याचे काम फार त्वरित झाले म्हणून याचे नाव अवचितगड पडले. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत या गडाचा उपयोग कुंडलिका नदी आणि तिच्या खाडीवर लक्ष ठेवण्यासाठी होत असून १८१८ मध्ये हा किल्ला ब्रिटिशांनी पेशव्यांकडून जिंकून घेतला. (विकिपिडीयावरून साभार). किल्ला बघताना वेळेचे भान राहिले नव्हते. दुपारचा प्रहर टळून गेला होता. किल्ला उतरताना पोटात कावळे ओरडू लागले होते. मेढा गावातील एका काकांकडे जेवणाची सोय Rock Climbers Club ने केली होती. त्यांच्याकडील विहीरीवर थंड पाण्याने अंघोळ केली आणि साग्रसंगीत जेवणाचा आस्वाद घेतला. बरोबर अवचितगडाची आठवण तोंडी लावणाऱ्या लोणच्यासारखी साथ देत होती.

❖

# सल

बालपणी मातेचे सुख हरपला
दुःख लपवुनी जीवन जगला
पण एक सल मात्र मनात दडला
किशोर वयात जमेल तसा जगला
तारुण्यात मात्र मनसोक्त वागला
म्हणती सारे तो आहेच चांगला
पंचविशीनंतर आली काट्यांसहित फुले
कधी फुलांनी हसविले तर काट्यांनी रडविले
तरीही हसरा मुखवटा धरून वावरला
पण मनात एक सल मात्र राहिला
तारुण्य संपून प्रौढपण आले
जीवनात अनेक बदल झाले
वार्धक्याकडे झुकली काया
तरी मातेची आठवते माया
माता हरपल्याचा एकच सल
तरीही तेही पचविले त्याने हलाहल
पण सल मात्र कायमचाच कोरला मनावर

**– सौ. निलीमा वि. विद्वांस** (पृ. ६५८)
बदलापूर जि. ठाणे
मो. ९८६०८३४८६१



: बालोद्यान :

## वटवट



उंदीरमामाच्या बागेमध्ये
बोका घेतो मोठ्ठा झोका
जो कोणी अडवील मध्ये
त्याला म्हणतो धरून ठोका



आई म्हणते मी काळी,
म्हणून माझी काळी छत्री
तर मग काळ्या कावळ्याची
छत्री तेवढी का गं पांढरी?

लठ्ठ बैलोबांची स्वारी
अगदीच कशी बाई मठ्ठ?
भर उन्हांत रोज दुपारी
जिलबीसाठी करते हट्ट!

# कन्यारत्न



आपले कुलबांधव श्री. प्रमोद कृष्ण मराठे, ठाणे (पृ. ३७६) यांची सुकन्या सौ. सोनाली तुषार गाडगीळ हीस कन्यारत्न झाले. मुलीचे नाव चैत्राली ठेवण्यात आले. मराठे प्रतिष्ठानद्वारा मराठ्यांची माहेरवाशीण सौ. सोनाली हिचे अभिनंदन तसेच चि. चैत्राली तुषार गाडगीळ या चिमुकल्या सुकन्येस अनेकोत्तम शुभाशिर्वाद श्री. प्रमोद कृष्ण आजोबा झाले म्हणून त्यांचे अभिनंदन!

# हसा लेको

घटस्फोटाचं प्रकरण कोर्टात सुरू होतं.
कोर्टाने नवऱ्याला आदेश दिला की अर्धा पगार बायकोला द्यावा लागेल.
नवरा खूश होऊन म्हणाला, 'अरे वा, म्हणजे निदान अर्धा पगार तरी माझ्याकडे राहाणार.'

**डॉक्टर** : प्रकृती तशी ठीक आहे, सकाळी उठल्यावर रोज एक कप गरम पाणी पित जा.
**पेशंट** : डॉक्टर, लग्न झाल्यापासून गेली नऊ वर्षे रोज सकाळी गरम पाणीच पितो आहे. पण बायको त्याला 'चहा' म्हणते.

**पत्रकार** : काकू, तुमचा मुलगा २०० कोटींच्या कंपनीचा सीईओ झाला. कसं वाटतंय तुम्हाला?
**काकू** : ठीक आहे, पण अजून थोडी मेहनत केली असती तर सरकारी नोकरी लागली असती ना.

# वाचकांचा पत्रव्यवहार

प्रति, संपादिका
सप्रेम नमस्कार,

मराठे प्रतिष्ठानच्या समस्त कुलबांधव/भगिनींना हार्दिक शुभेच्छा.

सोबत माझी 'शब्द चित्र रेखता' पुस्तकाची प्रत, एक कविता, हस्ताक्षरात हवी असल्याने स्वतंत्र पेपरवर लिहून पाठवीत आहे.

पुस्तक प्रकाशन २६-२-२०१७ माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्यात झाले. मराठी विषयाच्या अभ्यासू निवृत्त शिक्षिका सौ. भारती लट्ट यांच्या हस्ते, माजी मुख्याध्यापिका सौ. महाबळेश्वरकर प्रिया यांच्या उपस्थितीत माझ्या माजी विद्यार्थ्यांच्या संपन्न झालेल्या कार्यक्रमाचा फोटो साईटवर पाठविते. सदर पुस्तक भेट स्वरूपात देण्यासाठी कोणास हवे असल्यास त्या प्रति तुमच्याकडे दिल्या तर चालेल का ते कळवावे. सहकार्याबद्दल धन्यवाद.

सर्वांना पुनःश्चस नमस्कार.

कळावे,
आपली
**कुमुदताई**, ठाणे
(९२२४२६११०९)

---

## गुणवत्ता पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांची सूची - मार्च, एप्रिल २०१६

| अनु. | नाव | विद्यापीठ/मंडळ | परिक्षा | गुण | पैकी | टक्के | पारितोषिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अभिजित मराठे | अभियांत्रिकी- मुंबई विश्वविद्यालय | इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी | ४५२ | ४८० | ९४.१७% | १५०० | |
| २ | सानिका सुनील मराठे | महाराष्ट्र बोर्ड | १० वी S.S.C. | ४७६ | ५०० | ९५.२०% | १०००<br>५००<br>५०० | <br>कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ<br>कै. कु.अनिता खांबेटे स्मरणार्थ |
| ३ | सम्यक सुनील मराठे | महाराष्ट्र बोर्ड | १० वी S.S.C. | ४७० | ५०० | ९४.००% | १००० | |
| ४ | अनुव्रत मिलिंद मराठे | महाराष्ट्र बोर्ड | १० वी S.S.C. | ४६२ | ५०० | ९२.४०% | १००० | |
| ५ | श्रिया हेरंब चक्रदेव | महाराष्ट्र बोर्ड | १० वी S.S.C. | ४४० | ५०० | ८८.००% | ८०० | |
| ६ | अजिंक्य दिलीप विद्वांस | महाराष्ट्र बोर्ड | १० वी S.S.C. | ४३२ | ५०० | ८६.४०% | ८०० | |

# राजगड : एक अभेद्य किल्ला

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

राजगड, म्हटलं की खूप गोष्टी नजरेसमोर येऊ लागतात. इतिहासातील बऱ्याच घटनांना साक्षी असलेला हा किल्ला बेलाग असा आहे. कितीही वेळा गेलो तरी पुन:पुन्हा जावेसे वाटते. तर अशा या गडावर माझा मोठा भाऊ बरेच वर्षापासून जायचे ठरवत होता पण काही कारणाने राहून जात होतं. त्याचे पन्नास वय सुरू असताना मी म्हटलं की यंदा जाऊ परंतु काही कारणाने राहून गेलं. म्हणून यंदा मी मीच पुढाकार घेतला व माझ्या पन्नाशीत आमच्या ट्रेकच्या सुरुवातीच्या काळातील सर्वांना घेऊन मोहीम करायची ठरवली. तारीख होती ११ व १२ फेब्रुवारी २०१७. होय नाही करता करता नवे जुने मिळून १८ जण जमले व जायची तयारी केली.

पहाटे ४ वा. बोरिवलीहून टेम्पो ट्रॅव्हलर बसने राजगडासाठी प्रस्थान केले. सोबत माझा मित्र राजगड व रायगडचा अभ्यासक संजय तळेकर सपत्नीक सामिल झाला होता. त्यामुळे सर्वांना किल्ला फिरताना माहीतीही मिळणार होती. वाटेत प्रत्येकाला घेत घेत ठीक दहा वाजता गडाच्या पायथ्याच्या गुंजवणे गावी पोहोचलो. तेथे चहा पिऊन गड चढण्यास सुरुवात केली. रमत गमत साधारण तीन तासांनी गडावर चोरदरवाजाने पाय टेकले. पद्मावती मंदीरामधे मुक्काम टाकला.

अगोदर फोनवर बोलल्याप्रमाणे गावकरी सुनिलने जेवण तयारच ठेवले होते. हातपाय धुऊन गरमागरम जेवणावर सर्वांनी मस्तपैकी हात मारला व थोडा आराम करुन गड फिरण्यासाठी निघालो. पद्मावती माचीवरुन निघून पहिल्यांदा गुंजवणे दरवाजा पाहिला. अतीशय मजबूत बांधणीअसलेला हा दरवाजा व त्याची तटबंदी व त्यावरील नक्षीकाम या सर्वांचे सविस्तर वर्णन संजयने सर्वांसमोर केले.

किल्ला साधारण कोणत्या काळातील असावा तसेच कोणकोणत्या राजसत्तांच्या ताब्यात हा किल्ला होता याचे सविस्तर वर्णन संजयने केले. बऱ्याच जणांना असे वाटते की छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला. मात्र तसे नसून त्यांनी या किल्ल्याचे महत्त्व ओळखून त्याचा वापर केला. खूपच सुरक्षित असा हा किल्ला आहे.

तेथून निघुन बालेकिल्ल्याला वळसा घालून संजिवनी माचीकडे प्रस्थान केले. माचीवरुन सूर्यास्ताचे विलोभनीय दर्शन झाले, फोटो झाले व काळोख पडता पडता परतीला लागलो. ही संजिवनी माची म्हणजे खूपच सुंदर आहे. याला दुहेरी तटबंदी आहे तसेच खंदकही आहे. त्या खंदकातून जाताना मजा येते.वाटेत थांबून संजयने इतिहासाची सविस्तर उजळणी




केली. माहीती घेता घेता किल्ला पहाणे खुपच आनंददायी असते हे सर्वांच्या प्रत्ययास आले. पूर्ण काळोख पडल्यावर व चंद्र उगवल्यावर, चंद्र प्रकाशात ९ वा. परत पद्मावती मंदीरात आलो. फिरुन सर्वजण खुप दमले असल्याने अगोदर चहाचा आस्वाद घेतला व तलावावर हातपाय धुऊन ताजेतवाने झालो. पुन्हा मस्त पैकी जेवण झाले व हळू हळू गप्पा मारत थकले भागले जीव झोपी गेलो.


सकाळी वेळेत उठून चहा पोहे खाऊन सुवेळा माचीकडे निघालो. संजयबरोबर माहीती ऐकत सुवेळा माचीच्या टोकापर्यंत पोहोचलो. संजिवनी माचीप्रमाणे सुवेळा माची देखील अप्रतिम आहे. या राजगडाचे हेच वैशिष्ट्य आहे की तीन माच्या, पद्मावती, संजिवनी व सुवेळा म्हणजे पंख्याची तीन पाती व मधे बालेकिल्ला.

हा बालेकिल्ला म्हणजे अप्रतिमच. सुवेळा माचीचे विविध कोनातून फोटो काढून परत निघून बालेकिल्ल्याकडे निघालो. राजगडाचा बालेकिल्ला म्हणजे अप्रतिम अनुभव. एवढ्या उंचावरती पाण्याचा तलाव, सुंदर. पूर्ण बालेकिल्ला संजयच्या मार्गदर्शनाखाली फिरताना सर्वजण खुप खुश झाले. एक छोटी गुहा सुस्थितीत आहे. वर काही बांधकामाचे अवशेष आहेत. नैसर्गिक नेढं आहे. इथून निघायची इच्छाच होत नव्हती मात्र इलाज नव्हता. पूर्ण बालेकिल्ला मनसोक्त फिरुन सर्वजण परतीला लागलो.

पुन्हा थकून भागून सर्वजण पद्मावतीच्या देवळात पोहोचलो. तलावावर जाऊन ताजेतवाने होऊन जेवणावर आडवा हात मारला. भरपेट जेवून सुनिलला दुवा देत परतीच्या प्रवासाला लागलो. सर्वांच्या सहकार्याने व माझा मित्र संजय तळेकर याच्या माहीतीने एक सुंदर गडमोहीम यशस्वीपणे पार पडली. ❖






| 4 X 4 MAGIC SQUARES | | शब्द चित्र रेखता | | कठोपनिषद्भावार्थ | |
|---|---|---|---|---|---|
| लेखक | श्री. प्रभाकर सी. मराठे (भ्रमणध्वनी ९६११८९६४३५) | लेखक | कुमुद मराठे-डोके (भ्रमणध्वनी ९२२४२६११०९) | लेखक | श्री. प्रभाकर सी. मराठे (दूरध्वनी ०२२-२६६७२२०५) |
| प्रकाशक | केशव भिकाजी ढवळे | प्रथमावृत्ती | २७ फेब्रुवारी २०१७ मराठी राजभाषा दिन | प्रकाशक | केशव भिकाजी ढवळे |
| पृष्ठसंख्या | ९६ | पृष्ठसंख्या | १३२ | | |
| किंमत | १००/- रु. | किंमत | १५०/- रु. | | |



**BOOK POST**

**If undelivered, Please return to**

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.



पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**